सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ४२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ३ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## गोपीचंद पडळकरांसह विधानपरिषदेच्या ५ रिक्त जागेवर निवडणूक कार्यक्रम जाहीर;मतदानाची तारीख ठरली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ मुंबई**

राज्यातील विधानसभा निवडणुकानंतर आता विधानपरिषदेच्या ५ जागांसाठीची निवडणूक जाहीर झाली आहे. त्यामुळे, आता विधानपरिषदेच्या या ५ जागांवर कोणाचा नंबर लागणार याची उत्सुकता सर्वांनाच आहे. विधान परिषदेच्या रिक्त जागांसाठी निवडणूक जाहीर झाली असून २७ मार्च रोजी मतदान प्रकिया पार पडणार आहे. त्यासाठीचा निवडणूक कार्यक्रम निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आला आहे. भाजपच्या ३, राष्ट्रवादी अजित पवार १ आणि शिवसेना शिंदे गटाच्या



१ आमदारांसाठी ही निवडणूक पार पडणार असून या निवडणुकीसाठी मतदानाचा अधिकार केवळ आमदारांना असणार आहे. सध्या, राज्यात भाजप महायुतीला मोठं बहुमत असल्याने या जागांवर पुन्हा संबंधित पक्षाचेच उमेदवार विजयी होतील. मात्र, राजकीय पक्षांकडून कोणाला संधी मिळणार याची उत्सुकता सर्वांनाच आहे.

विधानसभा निवडणुकीत विजयी झाल्यामुळे विधानपरिषदेवर असलेल्या ५ आमदारांच्या जागा रिक्त झाल्या आहेत. त्यामध्ये, शिवसेना शिंदे गटाचे आमदार आमशा पाडवी, राष्ट्रवादी काँग्रेस राजेश विटेकर, भाजप आमदार प्रवीण दटके,

### कसा असेल निवडणूक कार्यक्रम

१० मार्च ते १७ मार्च अर्ज भरण्याची प्रक्रिया
अर्जाची छाननी १८ मार्च रोजी होणार
२० तारखेला अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस
२७ तारखेला विधान परिषदेच्या जागांसाठी मतदान घेण्यात येणार आहे.

भाजप गोपीचंद पडळकर आणि भाजपा रमेश कराड या सदस्यांच्या रिक्त जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. आता, या रिक्त जागांसाठी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीकडून कोणाला संधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आमदार आमश्या पाडवी यांचा विधानपरिषदेचा कार्यकाळ ७ जुलै २०२८ पर्यंत आहे. तर, राष्ट्रवादीच्या राजेश विटेकर यांचा कार्यकाळ २७ जुलै २०३० पर्यंत आह. भाजप नेते आणि आमदार प्रवीण दटके यांचा कार्यकाळ १३ मे २०२६ पर्यंत असून आमदार रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर यांचाही कार्यकाळ १३ मे २०२६ पर्यंत आहे. मात्र, विधानसभा निवडणुकीत हे सर्व आमदार विजयी झाल्याने त्यांच्या रिक्त जागेवर याच महिन्यात निवडणूक होणार आहे.

## औरंगजेबाची छत्रपती संभाजी महाराजांसोबत धर्माची लढाई नव्हती; अबू आझमींच्या विधानाने नवा वाद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३मुंबई**

छत्रपती संभाजी महाराजांच्या आयुष्यावर आधारीत छावा चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. ऐतिहासिक चित्रपट संभाजी महाराजांच्या शौर्याचे चित्रण करत असूण तरुण पिढीला प्रेरणा देत आहे. राज्यातील सत्ताधारी आणि विरोधकांकडूनही चित्रपटाचे कौतुक करण्यात येत आहे. मात्र अशातच समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात वादग्रस्त विधान केलं आहे. छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेब यांच्यातील लढाई विषयी बोलताना अबू आझमी यांनी धक्कादायक विधान केलं आहे.



राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. यावेळी सपा नेते अबू आझमी हे देखील विधानभवनात दाखल झाले होते. यावेळी त्यांनी एका वृत्तवाहिनीसोबत बोलताना हे विधान केलं. औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता अशा आशयाचे विधान समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी केलं आहे. छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेबांमध्ये धर्माची लढाई नव्हती असंही वक्तव्य अबू आजमी यांनी केलं आहे.

औरंगजेबाच्या काळात भारताची सीमा अफगाणिस्तान आणि बर्मापर्यंत होती. त्या काळात आपला जो जीडीपी होता तो २४ टक्के होता. भारताला 'सोने की चिड़िया' म्हटलं जायचं. या सगळ्या गोष्टींना मी चुकीचं म्हणू का, असा सवाल अबू आझमी यांनी केला.छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेब यांच्यातील लढाई ही सत्तेसाठी होती. ही लढाई धर्मासाठी होती हे जर कोण बोलत असेल तर ते मी मानत नाही, असंही अबू आझमी यांनी म्हटलं.

तर अबू आझमी यांचे वक्तव्य चुकीचे असून त्यांना इतिहास माहिती नाही, असं प्रत्युत्तर भाजप आमदार राम कदम यांनी दिलं आहे.

## महाराष्ट्रात दोनच गुंडे, कोकाटे आणि मुंडे अधिवेशनात उमटले पडसाद, विरोधकांची घोषणाबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अपेक्षेप्रमाणे धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटेंच्या प्रकरणाचे पडसाद दोन्ही सभागृहात उमटले. दोन्ही मंत्र्यांचे राजीनामे घेण्यात यावे, अशी आग्रही मागणी विरोधकांकडून विधानसभा आणि विधान परिषदेत करण्यात आली. त्यापूर्वी विधानभवन परिसरात विरोधकांनी मुंडे आणि कोकाटेंना गुंड म्हणत घोषणाबाजी केली.

विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारपासून सुरू झाले. पहिल्याच दिवशी धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याच्या मुद्दा तापला. विधानभवनात आल्यानंतर महाविकास आघाडीच्या आमदारांनी धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात घोषणा दिल्या.

**महाराष्ट्रात दोनच गुंडे, कोकाटे आणि मुंडे**

विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विजय वडेट्टीवार, जितेंद्र आव्हाड यांच्यासह काँग्रेस, शिवसेना (यूबीटी) आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी निदर्शने केली. यावेळी 'महाराष्ट्रात दोनच गुंडे, कोकाटे-मुंडे, कोकाटे मुंडे', अशा घोषणा आमदारांनी देत माणिकराव कोकाटे आणि धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्याची मागणी केली.दरम्यान, विधानसभेचे



कामकाज स्थगित करण्यात आल्यानंतर अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये १५-२० मिनिटं चर्चा झाली. दुसरीकडे माणिकराव कोकाटे यांचीही विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत भेट झाली. या दोन्ही भेटींची विधानभवन परिसरात आणि राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस म्हणतात...मंत्री कोकाटेंच्या राजीनाम्यावर निर्णय होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

राज्यात महायुती सरकारचे अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरूवात झाली. पहिल्याच दिवशी विरोधक सत्ताधाऱ्यांविरोधात आक्रमक झाले. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यावर विधान परिषदेत विरोधक चांगलेच आक्रमक झाले होते.

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मंत्री माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाने शिक्षा ठोठावली असून, त्यांच्या राजीनाम्यावर कारवाई का होत नाही, असा



प्रश्न केला. त्यावरून सभापती, सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये गोंधळ झाला. या गोंधळानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री कोकाटे यांच्या राजीनाम्यावर कधी निर्णय होणार याची माहिती सभागृहाला दिली.विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सभागृहात शोक प्रस्ताव मांडण्याअगोदर बोलू द्यावे, अशी विनंती केली होती. सभापती राम शिंदे यांनी त्यानुसार दानवे यांना बोलण्यास परवानगी दिली. अंबादास दानवे यांनी सभागृहाचा मुद्दा नसला, तरी राज्याचे मंत्रिमंडळच्या अनुषंगाने हा विषय आहे, असे सांगून कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाने ठोठावलेल्या शिक्षेकडे लक्ष वेधले.

विधानसभेच्या सभागृहातील सदस्यांच्या अनुषंगाने विषय असल्याने तो खालच्या सभागृहात होईल ना, यावर बोलायचे असल्यास उद्या बोलता येईल, असे सभापती राम शिंदे यांनी सांगितले. त्यावर दानवे यांनी यावर सभागृह नेत्यांनी खुलासा केला तरी चालेल, असे म्हणून मंत्री कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती नाही. तर सरकारची भूमिका काय आहे? मंत्र्याला शिक्षा झालेली आहे. ती शिक्षा दोन वर्षांची आहे. याकडे दानवे यांनी लक्ष वेधले.

**फडणवीस म्हणाले...**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, देशाचे माजी पंतप्रधान तथा ज्येष्ठ नेते मनमोहन सिंग यांच्या शोक प्रस्तावा दिवशी, असा गोंधळ होईल, असे वाटलं नव्हते. विरोधी पक्षनेत्यांना एवढं सांगतो की, आपण मंत्री महोदयाच्या संदर्भाचा मुद्दा मांडता आहात, त्यासंदर्भात कोर्टानं सुनावणी पूर्ण केली आहे. आणि 'क्लोज फॉर ऑर्डर' ठेवलेलं आहे. त्यांची ऑर्डर आल्यानंतर त्यावर निर्णय सभागृह किंवा राज्यपाल घेतील.

## उद्धव ठाकरेंचा सातबारा कोरा होणार; आशिष जयस्वालांना राऊतांना टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

शिवसेना कोणाची यावरून सातत्याने उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे वाद सुरू असतात. दावे-प्रतिदावे केले जातात. संजय राऊत संधी मिळेल त्यावेळी शिंदे यांच्यावर आरोप आणि टीका करीत असतात. यावर आपले मत व्यक्त करताना शिंदे सेनेचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी पक्ष हा सातबारा प्रमाणे नातेवाईकांना हस्तांतरित होत नसतो, असे सांगून राऊतांवर बोचरी टीका केली.

संजय राऊत रोजच काही तरी बोलत असतात. बडबड करीत असतात. त्यांना आता कोणी गांभीर्याने घेत नाही. त्यांना निवडणूक लढायची नाही आणि राज्यसभेतील स्थान कायम ठेवायचे आहे. याकरिता ते सकाळी उठून काही तर टीकाटीपणी करतात. स्वतःकडे उद्धव ठाकरे यांचे लक्ष वेधून घेण्याचा त्यांचा सातत्याने खटाटोप सुरू असतो. मात्र त्याने काही फरक पडणार नाही, असे आशिष जयस्वाल यांनी स्पष्ट केले.



शिवसेना कोणाची हे आता सिद्ध झाले आहे. कोर्टाने आणि जनतेच्या न्यायालयातही शिवसेना ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची असल्याचे स्पष्ट झाले आहे. एकनाथ शिंदे यांनी आपल्या कामामुळे आणि कर्तृत्वाने लोकांच्या मनात स्थान मिळवले आहे. आपणच शिवसेनेचे वारसदार आहोत हे त्यांनी सिद्ध केले आहे. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांना मानणारा वर्ग हळूहळू एकनाथ शिंदे यांच्याकडे येत आहे आणि येतच राहणार आहे.आता एकनाथ शिंदे यांना कोणाचा सातबारा घेण्याची आवश्यकता नसल्याचे आशिष जयस्वाल म्हणाले.

## धमकीची ध्वनिफित फॉरेन्सिककडे सोपवली, प्रशांत कोरटकरच्या मूळ आवाजाचे नमुने मिळाल्यानंतरच निष्कर्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३कोल्हापूर**

कोल्हापूर : इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना आलेल्या धमकीच्या फोनची ध्वनिफित जुना राजवाडा पोलिसांनी फॉरेन्सिक लॅबकडे सोपवली. ध्वनिफित आणि संशयित प्रशांत कोरटकर याच्या मूळ आवाजाची पडताळणी केल्यानंतरच निष्कर्षापर्यंत पोहोचता येईल, अशी माहिती जुना राजवाडा पोलिसांनी दिली. दरम्यान, कोरटकरला अंतरिम



जामीन मंजूर झाल्याने त्याच्या शोधासाठी नागपूरला गेलेली पोलिसांची दोन पथके रविवारी रात्री परत आली.

प्रशांत कोरटकर याने इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना फोन करून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्ये केली. याबाबत सावंत यांनी जुना राजवाडा पोलिस ठाण्यात फिर्याद देऊन धमकीच्या फोनची ध्वनिफित पोलिसांकडे दिली आहे. ध्वनिफितीतील आवाज आणि संशयित कोरटकर याचा आवाज एकच आहे की दुसऱ्या कोणी कोरटकरच्या नावे फोन केला, याची पडताळणी करण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

## विधानसभेत पहिल्याच दिवशी नाट्य; मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले 'आता परिचयच करून देणार नाही'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईत आजपासून (ता. ०३ मार्च) सुरू झाले आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधानमंडळ परिसरात नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. आमदार जितेंद्र आव्हाड हे दोन्ही हातात बेड्या घालून आले होते. विधीमंडळाच्या पायऱ्यावर खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आमदारांच्या स्वागतासाठी उभे होते. सभागृहाबाहेर काही घडामोडी चालल्या होत्या, तशाच काहींशा नाट्यमय घडामोडी पहिल्याच दिवशी विधानसभेच्या सभागृहात पाहायला मिळाल्या.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा प्रारंभ हा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या अभिभाषणाने झाला. आजपासून सुरू झालेले हे अर्थसंकल्पीय अधिवशेन २६ मार्चपर्यंत चालणार आहे. म्हणजे हे अधिवेशन तब्बल २३ दिवस चालणार आहे. मुख्य म्हणजे राज्याचे अर्थमंत्री अजित पवार हे १० मार्च रोजी विधानसभेत राज्याचा अर्थसंकल्प सादर



करणार आहेत, तर विधानसभेत अर्थराज्यमंत्र्यांना अर्थसंकल्प मांडणार आहेत.राज्यपाल राधाकृष्णन यांच्या अभिभाषणानंतर वंदे मातरम आणि महाराष्ट्र गीत 'गर्जा महाराष्ट्र माझा' या गीतांनी विधानसभेत कामकाजाला सुरुवात झाली. विधानसभा अध्यक्ष ड राहुल नार्वेकर यांनी सुरुवातीला नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय हा विषय सभागृहात पुकारला. विधानसभेचे नेते या नात्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विधानसभा निवडणुकीत नव्याने निवडून आलेल्या सदस्यांचा परिचय करून देण्यासाठी उठले.

देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण मतदारसंघातून निवडून आलेले विलास सांदिपान भूमरे या सदस्याची ओळख सभागृहाला करून दिली. विधानसभा अध्यक्षांच्या माध्यमातून सभागृहाला हा परिचय करून देताना मला अतिशय आनंद होत आहे, असेही फडणवीस यांनी म्हटले.

भूमरे यांच्या परिचयाचे निवेदन वाचून झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागे बघत 'कुठे आहेत' अशी विचारणा केली. मात्र, भूमरे जागेवर नव्हते, त्यामुळे सभागृहात चलबिचल सुरू झाली. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'आता परिचयच करून देणार नाही' अशी भूमिका मांडली. मात्र, ठीक आहे, नवीन आहेत, असे सावरण्याचाही प्रयत्न केला. त्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधानसभेत नाट्यमय घडामोडी पहायला मिळाल्या.

## आरोग्य विभागाच्या कामांना मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिल्याची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३ मुंबई**

आज विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला दिवस होता. यावेळी अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते तथा माजी आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी देखील हजेरी लावली होती. यावेळी तानाजी सावंत यांनी माध्यमांशी संवाद साधत विविध विषयांवर भाष्य केलं. दरम्यान, तानाजी सावंत यांच्या कार्यकाळातील तब्बल ३१९० कोटींच्या कामांना राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिल्याची चर्चा आहे. या चर्चांवर आज तानाजी सावंत यांनी भाष्य केलं आहे. तसेच अशा पद्धतीने कोणत्याही गोष्टीला राज्याच्या मंत्रिमंडळाने किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी स्थगिती दिलेली नाही, असं स्पष्टीकरण तानाजी सावंत यांनी दिलं आहे.

तानाजी सावंत यांना महायुतीच्या सरकारच्या मंत्रिमंडळात स्थान मिळालेलं नाही. यावरून ते नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

## संपादकीय ......

# सिंहस्थ कुंभमेळ्याची रंगीत तालीम

*नाशिक-त्र्यंबकेश्वर शहरांत २०२७ मध्ये होऊ घातलेला सिंहस्थ कुंभमेळा निष्कंटक, आपदाविरहित व्हावा, यासाठी राज्य सरकार अलर्ट मोडवर आले आहे. नुकत्याच पार पडलेल्या उत्तर प्रदेशातील प्रयागराज महाकुंभमेळ्यात निर्माण झालेल्या लहानसान संकटांची व्युत्पत्ती आगामी काळात होऊ नये, यासाठीची खबरदारी घेण्याची सरकारची भूमिका आहे.*

*एक मेगा इव्हेंट म्हणून तो शत-प्रतिशत यशस्वी होण्यासाठी म्हणूनच सुमारे दोन-अडीच वर्षे आधीच सूक्ष्म नियोजनांतर्गत बैठकींचे सोपस्कार पार पाडले जात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या तिसर्या आढावा बैठकीत अनेक मुद्द्यांवर झालेली चर्चा म्हणजे नियोजन, समन्वय आणि द्रुतगती परिचालन या त्रिसूत्रीची बांधबदिस्ती असल्याचे म्हणता येईल. प्रयागराज कुंभमेळा नियोजन, तिथे आकस्मिक घडलेल्या दुर्घटना आणि उद्भवलेली वाहतूक कोंडी या बाबी नाशिक-त्र्यंबकेश्वरमधील आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी जणू आरसा ठरावा. प्रयागराजला एकूण ६६ कोटी भाविकांची गर्दी झाल्याची सरकार दप्तरी नोंद झाली आहे. नाशिक-त्र्यंबकला २०१४-१५ मधील कुंभमेळ्यात झालेल्या गर्दीच्या चार ते पाच पट गर्दी आगामी काळात होण्याची शक्यता आहे. भौगोलिकदृष्ट्या नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील अनुक्रमे रामकुंड व कुशावर्त ही मुख्य स्थळे दोन्ही शहरांच्या भरवस्तीत आहेत. शिवाय दोन्ही ठिकाणांहून अगदी पाच किलोमीटर परिसर गृहीत धरला, तरी अरुंद रस्ते आणि तदनुषंगिक गर्दी नियंत्रणाचे मोठे आव्हान लक्षात घेता जोखमीचा आलेख उंचावता राहणार, हे नक्की! २००३ मधील सिंहस्थ कुंभमेळ्यात नाशिकमधील अरुंद गल्लीत चेंगराचेंगरी होऊन तब्बल ३१ भाविकांना प्राण गमवावे लागले होते. याच अनुषंगाने आताच्या कुंभमेळ्यात डिजिटल आणि एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर शासक-प्रशासकांचे एकमत झाले, हे सकारात्मक पाऊल मानले जावे.*

*वाहतूक कोंडी आणि वाहनांद्वारे होणारे मोठ्या प्रमाणावरील प्रदूषण टाळण्यासाठी बाहेरील भाविकांना ई-बसेस उपलब्ध करून देण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना स्वागतार्ह आहे. रस्त्याच्या कडेला टेंट सिटी उभारणी, शिर्डी- ओझर- छत्रपती संभाजीनगर विमानतळांवर प्रवासी नियोजन, नाशिकमधील हेलिपॅड संख्यावाढ, रामकुंड-कुशावर्तसह इतर कुंडांचे सौंदर्यीकरण, नाशिकमधील रामकाल पथाचे निर्माण यादेखील नियोजनाला बळ देणार्या बाबी आहेत. कुंभमेळ्याला उपस्थिती दर्शवणार्या देशभरातील भाविकांमध्ये प्रवासासाठी सर्वाधिक पसंती रेल्वे प्रवासाला असते. स्वाभाविकच नाशिक रोड, इगतपुरी आणि कसारा रेल्वेस्थानकांत वैविध्यपूर्ण सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. कुंभमेळ्यानिमित्त नाशिक-त्र्यंबकला येऊ घातलेला भाविकांचा ओघ समीपच्या धार्मिकस्थळी जावा म्हणून त्र्यंबक-शिर्डी-वणी- शनिशिंगणापूर-मांगीतुंगी हा धार्मिक कॉरिडॉर म्हणून विकसित करण्यावरही बैठकीत शिक्कामोर्तब झाले. यामुळे या स्थळांची जगभर ओळख निर्माण होऊन अर्थकारणालाही बळकटी निर्माण होण्याची शक्यता अधिक गडद होईल. प्रयागराज कुंभपर्वात सध्या नाशिकचा प्रशासकीय गाडा हाकणार्या सर्वच उच्चस्तरीय अधिकार्यांनी भेट देऊन तेथील नियोजनात्मक आढावा घेतला होता. ती एकप्रकारे आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी रंगीत तालीम ठरावी, ही अपेक्षा आहे.*

*गेल्या सिंहस्थ कुंभपर्वापेक्षा आगामी कुंभमेळा कमाल तंत्रज्ञानाच्या वापरातून वेगळेपण सिद्ध करणारा ठरणार आहे. आज विविध क्षेत्रांचा ताबा घेऊन प्रभाव निर्माण करणार्या डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर कुंभपर्वात पावलोपावली होणार, हे स्पष्ट झाले आहे. याद्वारे गर्दी नियंत्रण, घात-अपघात अथवा दुर्घटनामुक्त वातावरण यासारखे उद्देश साध्य होणार आहेत. त्याच अनुषंगाने मुख्यमंत्र्यांच्या भाषेत आगामी कुंभपर्व डिजिटल टेक्नो कुंभ म्हणून लौकिकास पावावा, यासाठी प्रशासन कंबर कसणार, यामध्ये शंका नाही. सिंहस्थ कुंभमेळा यशस्वी करून मराठी मुलखासह देशातील भाविकांच्या समाधानाचे शिक्कामोर्तब करून घेण्यासाठी राज्याचे मुखिया या नात्याने देवेंद्र फडणवीस नियोजनात लक्ष घालून आहेत. अर्थात, त्यांच्या प्रयत्नाचा यशालेख अनुभवण्यासाठी दोन वर्षांहून अधिक काळाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.*

# शिवसेना फोडाफोडीचा दुसरा अंक तेजीत

**शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्रिपदावरून पायउतार झाल्यानंतर पक्षवाढीच्या कामाला लागले आहेत. त्यांनी नव्या दमाने उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला धक्के द्यायला सुरुवात केली आहे. उद्धवसेनेचे माजी आमदार राजन साळवी आणि सुजित मिणचेकर यांना एकनाथ शिंदे यांनी नुकताच पक्षप्रवेश देऊन मोठा धक्का दिला आहे.**



राजन साळवी हे शिवसेनेचा बालेकिल्ला राहिलेल्या रत्नागिरी जिल्ह्यात आमदार होते. एकनाथ शिंदे यांनी शिवसेना फोडली तेव्हाच राजन साळवी हे त्यांच्यासोबत जाणार असल्याची चर्चा होती; मात्र साळवी यांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडली नाही. त्याची किंमत त्यांना चुकवावी लागली. त्यांना काही भ्रष्टाचाराच्या आरोपांना आणि चौकशीलाही सामोरे जावे लागले. त्यांना अटक होते की काय, अशी स्थिती निर्माण झाली होती; मात्र कारवाई थांबली. तथापि, राजन साळवी यांचा विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर राजकारणात बाजूला पडलेले साळवी शिंदेसेनेत सामील झाले. त्यामुळे उद्धवसेनेला मोठा धक्का बसला.कोल्हापूर जिल्ह्यातील शिवसेनेचे माजी आमदार सुजित मिणचेकर यांनीही उद्धव ठाकरे यांची साथ सोडली आहे.

त्यांनी शिंदेसेनेचा भगवा हाती घेतला आहे. कोल्हापूरमध्येदेखील शिवसेनेला नेहमी चांगले यश मिळत आले आहे; मात्र विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरेंची शिवसेना की एकनाथ शिंदे यांची शिवसेना? यामध्ये कोल्हापूरकरांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा दिला. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची ताकद घटली आहे. अशावेळी सुजित मिणचेकर यांनी आपले राजकीय भवितव्य सुरक्षित करण्यासाठी शिंदेसेनेला जवळ केले आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी राज्याच्या राजकीय मंचावर फोडाफोडीचा दुसरा अंक सुरू केला आहे. अपक्ष आमदार शरद सोनवणे यांनाही एकनाथ शिंदे यांनी पक्षात घेतले आहे.शिंदेसेना आणि उद्धवसेनेत असलेला हा संघर्ष आता आणखी वाढत जाणार आहे.

मुंबई महापालिकेतील उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या पन्नासपेक्षा जास्त माजी नगरसेवकांना एकनाथ शिंदे यांनी गळाला लावले आहे. मातोश्रीशी कायम निष्ठावान राहिलेल्या राजूल पटेल यांच्यासारख्या माजी नगरसेवकांनीही उद्धव ठाकरे यांची साथ सोडली आहे. विधानसभा निवडणूक जिंकल्यानंतर महायुतीचे टार्गेट हे महापालिका निवडणूक आहे. विशेषतः मुंबई महापालिका जिंकण्यासाठी भाजप आपली सर्व शक्ती पणाला लावणार हे स्पष्ट आहे. निवडणुकीआधी उद्धव ठाकरे यांचा पक्ष खिळखिळा करण्यासाठी भाजप दुसर्या बाजूला एकनाथ शिंदे यांची ताकद वापरत आहे.

त्यामुळे येणार्या काळात दोन्ही शिवसेनेतील वाद आणखी वाढण्याची शक्यता आहे; मात्र दिवसेंदिवस पक्षाची शक्ती क्षीण होत चालल्याने उद्धव ठाकरे यांच्यापुढे शिंदेंचा मुकाबला करण्याचे आव्हान आहे.

# फार्मर आयडी कार्ड मंजूर झाल्यांनतर पुढे काय? डाऊनलोड कसं करायचं?

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक-** राज्यातील ज्या शेतकऱ्यांनी फार्मर आयडीसाठी नोंदणी केलेली आहे, अशा शेतकऱ्यांना युनिक आयडी मंजूर झाल्याचा मॅसेज येण्यास सुरवात झाली आहे. मग आता फार्मर आयडी मंजूर झाल्यांनतर ते डाऊनलोड कसे करायचे? असा प्रश्न सतावू लागला आहे. तर या लेखातून फार्मर आयडी कार्ड(ऋ्रीशी खऊ लरीव) कसे डाउनलोड करायचे, ते समजून घेऊया....

शेतकऱ्यांची शेतजमीन, शेती पिकांची माहिती, पिकांच्या उत्पन्नाची माहिती, बाजारभावाची माहिती, जमिनीचे डिजिटलायझेशन, जमीन आधार कार्ड, जमीन मालकाची माहिती इत्यादी गोष्टी एकाच छताखाली मिळणार आहेत. त्यासाठी राज्य सरकारने अग्रिस्टॅक योजनेंतर्गत फार्मर आयडी बनविण्याचे आवाहन केले आहे.




**अशी आहे प्रक्रिया**

सर्वप्रथम https://apfr.agristack.gov.in/farmer-registry-ap//checkEnrolmentStatus या संकेतस्थळावर भेट द्या.

शेतकऱ्यांना आधार कार्डनुसार जर फार्मर आयडीसाठी रजिस्ट्रेशन केलेले असेल तर त्या शेतकऱ्याचा आधार नंबर एंटर करायचा.

शेतकऱ्याचा आधार नंबर एंटर केल्याबरोबर त्या शेतकऱ्याची नोंदणी केल्याप्रमाणे माहिती दाखवली जाईल. या शेतकऱ्याचा जो युनिक आयडी बनलेला असेल, तो युनिक आयडी दाखवला जाईल.

सध्या यामध्ये दुरुस्तीचा पर्याय नसल्याने तुम्ही नोंद केलेली माहिती दाखवली जाईल.

या ठिकाणी आपल्याला तळशु ऊश-ींरळश्री असा पर्याय दाखवला जाईल.

यावर क्लिक केल्यानंतर शेतकऱ्यांची संपूर्ण माहिती





दाखवली जाईल.

त्याचबरोबर वरील बाजूस ऋ्रीशपशीरींश विष किंवा ऊुप्श्रेरव विष असा पर्याय देखील दिसेल.

या Download pdf वर क्लिक करून त्याची प्रिंट शेतकऱ्याला देऊ शकता.

आता काही दिवसातच पीएम नरेंद्र मोदी तसेच कृषी मंत्र्यांच्या माध्यमातून हे कार्ड वितरित करण्यात येतील. तसेच शेतकऱ्यांना थेट पोस्टाने देखील




पाठवण्यात येतील शिवाय शेतकऱ्यांना देखील -सीळींरलज्ञ च या संकेतस्थळावर जाऊन थेट फार्मर आयडी कार्ड डाउनलोड करता येणार आहेत.

# रक्षा खडसे प्रकरणात नवनीत राणांचा संताप... तर भर चौकात आणून फाशी द्यावी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३ अमरावती** केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीसह तिच्या मैत्रिणींची मुक्ताईनगर तालुक्यातील कोथळी गावातील संत मुक्ताई यात्रेमध्ये टवाळखोरांनी छेडछाड केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला. या प्रकरणातील टवाळखोर एका पक्षाचे कार्यकर्ते असल्याची माहिती समोर आली आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील या प्रकरणात विशिष्ट पक्षाचे कार्यकर्ते असल्याचे म्हटले आहे. आता छेडछाड प्रकरणावरून माजी खासदार नवनीत राणा यांनीही या प्रकरणी प्रचंड संताप व्यक्त केला आहे.



**नवनीत राणा यांनी काय म्हटलं आहे**

?तुम्ही राजकारण कोणत्याही पातळीवर न्या. पण असे प्रकार नका, हात जोडून विनंती करते. राजकारण गेलं खड्ड्यात, जर कोणीराजकीय व्यक्ती असं करत असेल तर भरचौकात आणून त्यांना फाशी द्यावी. व जर राजकीय व्यक्ती असे करत असतील तर हे खूप निदनीय गोष्ट आहे. आमचे गृहमंत्री कडक कारवाई करणार आहेत. मुलगी कोणाचीही असो. ती राज्यात सुरक्षित आहे आणि सुरक्षित राहणार, अशी संतप्त प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.करून केंद्रीय मंत्र्यांची मुलगी सुरक्षित नसेल तर इतरांचे काय, असा प्रश्न उपस्थित करुन केंद्रीय राज्यमंत्री रक्षाखडसे यांनी राज्यातील बिघडलेल्या कायदा सुव्यवस्था परिस्थितीवरुन राज्य सरकारला घरचा आहेर दिला. महिलांच्या सुरक्षेसाठी असलेल्या कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याची मागणी करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.




## कोरडा खोकला, कफामुळे वैतागलात? हा घरगुती उपाय करुन पाहा, दुखणं पळून जाईल...

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**

बदलत्या हवामानाचा आपल्या आरोग्यावर परिणाम होतो. यामुळे सर्दी, खोकला आणि घसा यांसारख्या आजारांना सामोरे जावे लागते. सतत खोकून आपणं हैराण होतो. अशावेळी सर्दी-खोकल्यासह ताप येणे, डोकेदुखी, अंगदुखी आणि नाक चोंदणे यांसारख्या गोष्टी देखील होतात. सर्दी-खोकला हा सामान्य आजार आहे. त्यामुळे अशावेळी आपण डॉक्टरांकडे जाण्याऐवजी काही घरगुती उपाय करतो. काही घरगुती उपायाचा वापर केल्याने आपल्याला यापासून सुटका मिळू शकते. आपल्या स्वयंपाकघरात हमखास मिळणारा पदार्थ म्हणजे आले. हा फक्त पदार्थांची चव वाढवत नाही तर आरोग्यासाठी फायदेशीर आहे. आले खोकला, सर्दी आणि खवखव बरी करण्यास मदत करते. आल्यामध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत. ज्यामुळे घसा दुखत असेल किंवा कोरडा खोकला असेल तर त्यापासून सुटका होण्यास मदत होते. आल्याचे सेवन कसे करायला हवे जाणून घेऊया.

सर्दी-खोकल्यावर आले रामबाण

आल्यामध्ये अँटिऑक्सिडंट्स आणि दाहक-विरोधी गुणधर्मांमुळे खोकला, सर्दी आणि घसा खवखवण्याचा समस्यांपासून आराम देते. तसेच रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे गुणधर्म आल्यामध्ये असतात. आल्याचा रस प्यायल्याने सर्दी-खोकल्यात आराम मिळतो. पचनक्रिया सुधारण्यास आणि जळजळ कमी करण्यास आले प्रभावी आहे. आल्याचे सेवन केल्याने शरीराला ऊर्जा प्रदान होते. आले हे प्राचीन औषधी आणि मसालेदार वनस्पती म्हणून ओळखली



जाते. उलटी, मळमळ किंवा गर्भावस्थेत आले चघळल्याने आपल्याला आराम मिळतो.

**आल्याचे सेवन कसे कराल?**

सर्दी, खोकल्यासाठी आल्याचा चहा पिणे उपयुक्त ठरेल. यासाठी ताजे आले सोलून लहान तुकडे करा. हे तुकडे पाण्यात उकळवून त्यात एक लवंग आणि लिंबाचा रस घाला. दिवसातून दोन ते तीन वेळा ही चहा प्यायल्याने घसा खवखवणे आणि खोकल्यापासून आराम मिळतो. आले कुस्करुन गरम पाण्यात उकळवून त्याचा काढा प्यायल्याने देखील आराम मिळतो. आल्याचा रस मधात मिसळून रिकाम्या पोटी घेतल्याने सर्दी-खोकला कमी होण्यास मदत होते.

# मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापासून तापमानात वाढ होण्यास होणार सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

फेब्रुवारीच्या पूर्वार्धातराज्यातील अनेक भागात तापमानवाढ दिसून आली.दुपारी घराबाहेर पडणे कठीण होईल इथपर्यंत उन्ह होते. याच महिन्यात तापमान ४० अंश सेल्सिअसपर्यंत गेले. मात्र, मार्च उजाडताच राज्यातील तापमानात बऱ्यापैकी घट झालेली दिसून येत आहे. तर राज्याच्या अनेक भागात ढगाळ वातावरण आणि थंड वारे देखील जाणवत आहे.

भारतीय हवामान खात्याने दोन दिवसांपूर्वीच एप्रिल-मे महिन्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला असताना, मार्च महिन्याची सुरवात या अंदाजाच्या विपरीत झाली आहे.विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये कमाल तापमानात किंचीत घट दिसून येत आहे. तर आज, रविवारी सकाळपासूनच वातावरणात किंचित गारवा जाणवत आहे. सकाळपासून ढगाळ वातावरण आहे. पश्चिम महाराष्ट्रातील तापमानात घट झालेली आहे.




मात्र, त्याचवेळी कोकणात येत्या दोन दिवसात प्रचंड उष्ण आणि दमट हवामानाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्याला यलो अलर्ट देण्यात आला आहे. सोलापूरमधील तापमानात अंशतः घट झाली आहे. पुण्यात आज, रविवारी आकाश निरभ्र असले तरीही येत्या काही दिवसात पुण्यातील कमाल तापमानात वाढ होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. सातारा आणि सांगली येथेही कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १८ अंश सेल्सिअस इतके असण्याची शक्यता आहे.

मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापासून कमाल तापमानात वाढ होण्यास सुरुवात होईल वाढण्यास सुरुवात होईल असा अंदाज आहे, तर अनेक राज्यांमध्ये महिन्याच्या अखेरीस कमाल तापमान ४० अंश सेल्सिअस पेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे, असाही अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ३ मार्च २०२५ शहर/ग्रामिण


# खा संजय राऊत यांच्या वक्तव्याचा शिवसेने तर्फे चपलेने बदडून निषेध

## दर्यापूर येथे शिंदे शिवसेना गट आक्रमक




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ दर्यापूर–** नुकत्याच झालेल्या मराठी साहित्य संमेलनात राजकिय वस्तुस्थिती सांगुण शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या निलमताई गोरे यांनी एक वक्तव्य केले होते, परंतु त्या वक्तव्याचा निषेध करतांना शिवसेना ऊबाठाचा शकुनी समजल्या जाणार्या खा. संजय राऊत यांनी निलमताई गोरे यांच्यावर खालच्या स्तरावर जाऊन वक्तव्य केले, नमकहराम, नालायक, घाण, अशा प्रकारे शब्द वापरुन चार वेळा आमदार असलेल्या व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विश्वासु असलेल्या निलमताई बद्दल अपशब्द वापरुन समस्त महिलांचा अपमान केलात्या मुळे अमरावती इळ्यातील दर्यापूर येथे शिंदे गट शिवसेनेच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटिल अरबट यांचे नेतृत्वात दर्यापूर येथिल छत्रपती शिवाजी महाराज चौकात संजय राऊत यांचा निषेध करण्यात आला.संजय राऊत मुर्दाबाद, निमका पत्ता कडवा है, संजय राऊत भडवा है अशा जोरदार घोषणा देऊन संजय राऊत यांच्या प्रतिमेला चपलानी बदडले व समस्त शिवसैनिकांनी राऊत यांचा निषेध नोंदविला.

या प्रसंगी जिल्हा प्रमुख गोपाल अरबट, तालीक प्रमुख महेन्द भांडे, मनोज गव्हाणे, अतुल सगणे, वैभव भांडे, गणेशराव गावंडे, तुषार चौधरी व असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

# मसानगंजमध्ये युवकाची हत्या



## कारागृहातून बाहेर येताच जुन्या वादातून चढविला हल्ला





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती**

कारागृहातून बाहेर येताच मारेकऱ्यांनी रविवारी (ता. दोन) सायंकाळी आपसी वादातून दुसरी हत्या केली आणि शहरातून पसार झाले. पोलीस हल्लेखोरांच्या शोधात आहेत. आदर्श राजेश गुप्ता (वय २६ रा. मसानगंज) असे मृताचे नाव आहे. तर शुभम मोहोड आणि अभिषेक अशी मारेकऱ्यांची नावे आहेत.

ऑक्टोबर २०२४ मध्ये शुभम मोहोड, अभिषेक, शुभसाहू आणि दीप साहू यांनी आपसी वादातून विक्की पटेरिया नामक युवकाची हत्या केली होती. तेव्हापासून चारही आरोपी कारागृहात होते. परंतु काही दिवसांपूर्वी चारही आरोपी कारागृहातून जामीनावर बाहेर आले होते. दरम्यान रविवारीसायंकाळी आदर्श गुप्ता आणि शुभम व अभिषेक समोरासमोर आले तेव्हा जुन्यावादातून त्यांच्यात तू तू मैं मै झाली. तेव्हा दोघांनी जवळील चाकू काढून आदर्शवर प्राणघातक हल्ला केला आणि तेथून पसार झाले. स्थानिक नागरिकांनी जखमीला जिल्हा सामन्य रुग्णालायत दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. घटनेची माहिति नागपुरी गेट पोलिसांना मिळताच पोलीस घटनास्थळी पोहचले आणि घटनास्थळाचा पंचनामा केला. हत्येचा गुन्हा दाखल करून मारेकऱ्यांचा शोध सुरु केला.

# देऊरवाडा शिवमंदिराबाबत पुरातत्व विभागाने लक्ष घालावे

## तुषार भारतीय यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ चांदूरबाजार**

तालुक्यातील देऊरवाडा येथील खोदकामात सापडलेले मंदिर हे ऐतिहासिक असल्याचे दिसून येते. त्यामुळे या मंदिराकडे पुरातत्व विभागाने लक्ष द्यावे व हे मंदिर जमिनीच्या आत सापडल्याने अधिक माहिती मिळते का? याकरिता खोदकाम करावे, अशी मागणी भाजपा नेते तुषार भारतीय यांनी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. चांदूर बाजार भागातील देऊरवाडा हे गाव ऐतिहासिक तसेच पौराणिक महत्व असलेले गाव आहे. अनेक धार्मिक ग्रंथात त्याचा उल्लेखही सापडतो. या गावातील पूर्णानदीला पयोष्णी म्हणून ओळखले जाते. ती देऊरवाड्याला उत्तरमुखी वाहत असल्याने वेगळ्याप्रकारचे महत्व आहे. या ठिकाणी नृसिंह मंदिर आहे. या पूर्णा नदीत स्नान केल्याने पुण्य प्राप्त होत असल्याचे सांगितले जाते. दहा दिवसापूर्वी नदीकाठी खोदकाम काम करताना एक मंदिर आणि



भुयारात शिवलिंग आणि एक देवीची मूर्ती सापडल्याने अनेक शिवभक्त दर्शनाला येत आहे. आपण स्वतः दर्शनाला जाऊन महाआरती केली. हे मंदिर किती वर्ष जून आहे. मंदिराची बांधणी मूर्ती आणि शिवलिंग किती वर्ष जूने आहे. कोणत्या पद्धतीचा दगड आहे. बांधकाम किती वर्ष जूने, याबाबत भक्तांमध्ये उत्सुकता आहे. हिंदू रिवाजप्रमाणे ज्या ठिकाणी शिवलिंगाची स्थापना असते, त्या ठिकाणी नंदी असते ते शोधण्यासाठी अजून खोदकाम करणे गरजेचे आहे. या करिता पुरातत्व विभागाचे मार्गदर्शन असणे गरजेचे आहे. या करिता लक्ष घालून पुरातत्व विभागातील अधिकाऱ्यांना पाठवण्याची आवश्यकता आहे. अनेकदिवस हे मंदिर जमिनीच्या आत असल्याने मंदिराची तपासणी होणे आवश्यक आहे. याकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालावे, असे पत्रात नमूद करण्यात आलेले आहे.–

# चुलत भावाच्या त्रासाला कंटाळून मूकबधिर युवकाची गळफास घेवून आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अचलपूर–** चुलतभाऊ वारंवार सर्वात देखत मुकबधीर असल्याचे इशाऱ्याने चिडवित असल्याने एका ३६ वर्षीय मुकबधीर युवकाने राहत्या घरात पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. आई वडीलांना आयुष्यभर मुलाची इशाऱ्याची भाषा समजली. परंतु, आत्महत्या करणार असल्याचा त्याचा इशारा कुणालाच न समजल्याने या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे. अचलपूर शहरातील सरमसपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बळेगावात ही घटना घडली.गोकुळ सुदाम भोरे असे मृतकचे नाव आहे. तर गुन्हे दाखल झालेल्या आरोपीचेनाव नागोराव पंजाबराव मोरे (३७) रा. बळेगाव असे आहे. माहितीनुसार, गोकुळ हा पूर्णतः मुकबधीर असून त्याला काही बोलता येत नव्हते व ऐकू येत नव्हते. तो अचलपुर येथील जगदंबा मुकबधीर विद्यालयात बीए प्रथमवर्षाला शिकत होता. तो नेहमी आईवडील, मित्र व नातेवाईकांसोबत इशाऱ्याच्या भाषेत बोलत होता. आईवडील त्याची इशाराची भाषा चांगल्या पध्दतीने समजत होते. परंतु, आरोपी नागोराव भोरे हा गोकुळला दिव्यांग असल्याबाबत वारंवार सर्वांसमोर, कुठेही इशाऱ्याने चिडवित होता. त्यामुळे गोकुळ चांगलाच त्रासला होता. ११ फेब्रुवारी रोजी गोकुळ हा आईवडीलांसह चुलत बहीणीच्या लग्नात सहभागी होण्यासाठी हरम गावात गेला होता. त्या लग्नात देखील नागोराव भोरे याने सर्वांसमोर गोकुळला इशाऱ्याने अपंग असल्याबद्दल चांगलेच चिडविले. त्यामुळे गोकुळने घडलेला प्रकार आईवडीलांना इशाऱ्याने सांगून घरी चलण्यास सांगितले. परंतु, आरोपी नागोराव हा नेहमी गोकुळला चिडवित असल्याने आईवडीलांनी त्याकडे फारसे लक्ष दिले नाही. गोकुळ हा वडीलांसह सायंकाळी घरी आला. संपूर्ण प्रवासात तो वडीलांना नागोरावमुळे त्रस्त असल्याचे इशाऱ्याने सांगत होता. घरी आल्यानंतर वडील काही कामानिमित्त बाहेर गेले असता गोकुळने घराचे सर्व दारे बंद करून पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. वडीलांनी घरी आल्यानंतर दार वाजविले असता गोकुळने दार न उघडल्यानेत्यांनी खिडकीतून पाहिले असता गोकुळ फासावर लटकलेला दिसला. ही घटना घडताच संपूर्ण गावात एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच सरमसपुरा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळ गाठून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी अचलपुर उपजिल्हा रूग्णालयातील शवगृहात दाखल केला. गोकुळच्या अंत्यविधीच्या सर्व प्रक्रिया आटोपल्यानंतर त्याचे वडील सुदाम नारायण भोरे (६३) यांनी नागोराव भोरे विरोधात सरमसपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याबाबत पोलिसांनी नागोराव विरोधात गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

# धामणगावात वैद्यकीय साहित्य सेवा सुविधा बँक सुरू

## आईच्या स्मृती प्रीत्यर्थ विनय शिरभाते यांचा सेवाभावी व प्रेरणादायी उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३धामणगाव रेल्वे**

समाजातील दुर्बल घटकांना नाममात्र शुल्कात वैद्यकीय उपकरणे देण्यासाठी येथील सामाजिक कार्यकर्ते विनय शिरभाते सरसावले असून त्यांनी आपल्या आईच्या स्मृती प्रीत्यर्थ वैद्यकीय साहित्य सेवा सुविधा बँक सुरू केली आहे.याचे लोकार्पण रविवारला (ता.२) डॉ.रीपल राणे यांच्या हस्ते झाले.या सेवाभावी उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते विनय शिरभाते यांनी आपली स्व.कुसुमताई सुरेशराव शिरभाते यांच्या स्मृती प्रित्यर्थ रुग्णाची सेवा करावी,या उद्देशाने येथील माहेश्र्वरी भवनासमोर वैद्यकीय साहित्य सेवा सुविधा बँक सुरू केली आहे.याचे लोकार्पण रविवारला (ता.२) डॉ.रीपल राणे




यांच्या हस्ते झाले.यावेळी सामाजिक कार्यकर्ते विनय शिरभाते,राजाभाऊ टेंभरे विजय देशमुख,जितेंद्र चौधरी,विलास बुटले,माजी सैनिक दिलीप दगडकर, भाजपाचे माजी शहराध्यक्ष प्रशांत बदनोरे, डॉ.सौ.कालिंदी राणे,नरेंद्र गुल्हाने, प्रवीण राठी यांच्यासह आदी उपस्थित होते.

> **समाजाचं ऋण फेडण्याचा हा अल्पसा प्रयत्न: विनय शिरभाते**
>
> ज्या समाजात आपण जन्म घेतला त्या समाजाचे आपण देणं लागतो.समाजातील अनेक गोर गरीब,गरजवंतांना या वैद्यकीय साहित्य सेवा सुविधेचा लाभ मिळावा हा प्रमुख उद्देश आहे.या माध्यमातून समाजचे ऋण फेडण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.
>
> **विनय शिरभाते,**सामाजिक कार्यकर्ते धामणगाव रेल्वे.

# दिव्यांग शिबीरातून ३४० लाभार्थ्यांची तपासणी

## अचलपूर पंचायत समितीच्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अचलपूर** दिव्यांग बांधवांना शासकीय योजनांचा लाभ सहज आणि विनाविलंब मिळावा, यासाठी अचलपूर पंचायत समितीने विशेष दिव्यांग शिबिराचे आयोजन केले. २८ फेब्रुवारी रोजी पंचायत समितीच्या प्रांगणात भरविण्यात आलेल्या या शिबिराला मोठ्या संख्येने दिव्यांग बांधवांनी हजेरी लावली. या शिबिरात एकूण ३४० दिव्यांग लाभार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तसेच त्यांना आवश्यक कागदपत्रे, शासकीय योजना आणि वैद्यकीय सल्ला यांची माहिती पुरविण्यात आली.दिव्यांग व्यक्तींना प्रमाणपत्रांसाठी आणि विविध शासकीय योजनांच्या लाभासाठी वारंवार सरकारी कार्यालयांचे फेरे मारावे लागतात. मात्र, या शिबिरामुळे एकाच ठिकाणी सर्व सोयी उपलब्ध झाल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला. यावेळी विविध शासकीय योजना, आर्थिक सहाय्य, आरोग्य तपासणी आणि दिव्यांग प्रमाणपत्रे यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले.या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी उपविभागीय राजस्व अधिकारी बळवंत अरखराव, तहसीलदार डॉ. संजय गरकळ आणि गटविकास अधिकारी सुधीर अरबट यांनी उपस्थित राहून दिव्यांग लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विविध योजनांची माहिती देत, भविष्यात अशा प्रकारच्या उपक्रमांची गरज असल्याचे सांगितले.

शिबिरात उपस्थित दिव्यांग व्यक्तींची ऑनलाईन नोंदणी करून युडीआयडी कार्ड तपासणी आणि नवीन प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. यामुळे दिव्यांगांना त्वरित आवश्यक कागदपत्रे मिळण्यास मदत झाली.या शिबिरात अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातील दिव्यांग पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. डॉ. प्रिती मोरे, डॉ. दिनेश खराते, डॉ. शशीकांत फसाटे, डॉ. दिप्ती उमरे, डॉ. हिना खान, डॉ. स्वाती सोनोने यांच्यासह वैद्यकीय व सहाय्यक कर्मचारी यांनी दिव्यांगांची




तपासणी केली.शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाल्याने दिव्यांग लाभार्थ्यांनी पंचायत समितीच्या उपक्रमाचे कौतुक केले. एका लाभार्थ्याने सांगितले की, आम्हाला वारंवार सरकारी कार्यालयात हेलपाटे मारावे लागत होते. मात्र, या शिबिरामुळे सर्व कामे एका ठिकाणी पार पडली. वेळ आणि त्रास वाचला.अचलपूर पंचायत समितीच्या प्रभावी नियोजनामुळे हे शिबिर यशस्वी ठरले. भविष्यात अधिकाधिक दिव्यांग लाभार्थ्यांना मदत करण्यासाठी असे शिबिरे नियमितपणे आयोजित करण्याचा संकल्प पंचायत समितीने केला आहे. आमचा प्रयत्न दिव्यांग बांधवांसाठी जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देण्याचा आहे, असे पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# पीडित तरुणीने आरडाओरडा का केला नाही? पोलिस तपासात धक्कादायक बाबी समोर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ पुणे**

स्वारगेट आगारातील एसटी बस मध्ये झालेल्या बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे याने पीडित तरुणीचा गळा दाबून तिला जीवे मारण्याची धमकी दिली असल्याची बाब तपासात समोर आली आहे. दत्तात्रय गाडे यांनी पीडित तरुणीचा गळा दाबला होता. त्यामुळे तरुणी प्रचंड घाबरली होती. मला जिवंत सोड, अशी याचना तिने दत्तात्रय गाडे याच्याकडे केली. त्याचाच फायदा घेऊन दत्तात्रय गाडे यांनी तिच्यावर अत्याचार केल्याची माहिती पोलिस तपासात सामोरे आहे.याबाबत पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार दत्तात्रय गाडे याने मुलगी बस मध्ये चढतात बसचा मुख्य दरवाजा आणि चालक तसेच प्रवाशांमध्ये असलेला दुसरा दरवाजा देखील बंद केला होता. गाडीमध्ये कोणीच नसण्याचे पाहून तरुणीने खाली उतरण्याचा प्रयत्न केला. मात्र गाडेने तिला



सीटवर ढकलून तिचा गळा दाबला. यावेळी सुरुवातीला तरुणीने आरडाओरड केली. मात्र, बसच्या काचा बंद असल्याने आवाज बाहेर आला नाही. गळा दाबल्या मुळे पीडिता प्रचंड घाबरली होती. तुला काय करायचे ते कर पण मला जिवंत सोड, अशी याचना तिने गाडे कडे केली. तरुणी घाबरलेली पाहून याचा फायदा घेत या नराधमाने तरुणीवर दोन वेळा अत्याचार केले.

यापूर्वी देखील त्याने बलात्काराचा प्रयत्न केला असल्याची माहिती

दत्तात्रय गाडे हा सराईत गुन्हेगार आहे. त्याचे कुटुंबीय त्याचा बचाव करत असले तरी यापूर्वी देखील त्याने एका महिलेवर बलात्काराचा प्रयत्न केला असल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली आहे. मात्र, संबंधित महिलेने घाबरल्यामुळे हे प्रकरण पुढे नेले नाही. त्या महिलेने केवळ दत्तात्रय गाडे याच्याविरुद्ध चोरीची तक्रार दिली होती. दत्तात्रय गाडे हा दिवसभर गावामध्ये थांबून रात्री पुण्यात शिवाजीनगर, शिरूर, स्वारगेट आदी बस स्थानकावर महिला सावज शोधत असे, अशी कबुली देखील त्याने यापूर्वीच पोलिसांना दिली आहे. यापूर्वी देखील स्वारगेट पोलिसांनी जानेवारी महिन्यात मोबाईल चोरी प्रकरणी त्याला ताब्यात घेतले होते. मात्र त्यावेळी देखील गाडे याचे कुटुंबीय त्याच्या पाठीशी उभे राहिल्याने तो सुटला होता.

# जिल्ह्यातील 3 हजार ९६३ शेतकरी अजूनही कर्जमाफीपासून वंचित

## पोर्टल बंद; १७१० शेतकऱ्यांना प्रतीक्षा तर २२५३ चे आधार प्रमाणिकरण रखडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अमरावती** ३महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये २०१९ ला शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभजिल्ह्यातील ३९६३ शेतकऱ्यांना अद्यापही मिळाला नाही. सद्यःस्थितीत पोर्टल बंद झाले आहे. त्यामुळे १ हजार ७१० शेतकऱ्याचे आधार प्रमाणीकरण होऊनही त्यांची कर्जमाफी झाली नाही. तर २ हजार २५३ जणांचे आधार प्रमाणीकरण देखील रखडले आहेत.

सततची नैसर्गिक आपत्ती व शेतमालास नसलेला भाव यामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर वाढला होता. परिणामी कर्ज न भरू शकल्याने ते नवीन कर्जासाठी अपात्र ठरू लागलेत. यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांमध्येवाढ होऊ लागली. सत्तेवर आलेल्या महाविकास आघाडीने २७ डिसेंबर २०१९ ला शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजना लागू केली. यो योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१९ या कालावधीत पीक कर्ज तसेच पुनर्गठीत शेतीकर्जदारांना ५० हजार ते दीड लाख रुपयांची कर्जमाफी देण्यात येणार होती. जिल्ह्यातील १ लाख ३३ हजार ९७४ कर्जदार शेतकऱ्यांनी त्यासाठी अर्ज केलेत. त्यापैकी १ लाख २० हजार ९०३ कर्ज खाती आधार प्रमाणीकरण झाल्याचे दर्शवत त्यांना



कर्जमाफीसाठी पात्र केले आहे.

१ लाख १९ हजार १९३ शेतकऱ्यांना ८५७कोटी २७ लाख रुपयांची कर्जमाफी केली. परंतु यातील १७१० शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले तरी देखील त्यांची कर्जमाफी झाली नाही. याशिवाय २ हजार२५३ खाती आधार प्रमाणित झाले नाही. हे पोर्टल बंद करण्यात आल्याने असे जिल्ह्यातील ३,९६३ शेतकरी या योजनेपासून वंचित आहेत. लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांनी त्यासाठी जिल्हा उपनिबंधक कार्यालयामार्फत निकषांची पूर्तता करत लाभ मिळावा यासाठी लोकसभा निवडणुकीपूर्वी संधी देण्यात आली. शेतकऱ्यांनी ती प्रक्रिया पूर्ण केली. मात्र अजूनही त्यांच्या अर्जाचा विचार महायुती सरकारने केलेला नाही.सदर शेतकरी बैंका व जिल्हा उपनिबंधक कार्यालयात पायपीट सुरू आहे. विद्यमान स्थितीत या योजनेचे शासकीय पोर्टल बंद केले ते पुन्हा सुरू होईल का यात शंका आहे. त्यामुळे आता या वंचित कर्जदारांचे कर्ज माफ होण्याची आशा धुसर झाली आहे.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी जिल्हा काँग्रेसचे उद्याला इर्विन चौकात धरणे आंदोलन

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.३ अमरावती–** शेतकऱ्यांना कर्जमाफी सारखे आश्वासने देऊनही शासनाकडून कोणत्याच प्रकारचा प्रतिसाद शेतकऱ्यांना दिला जात नाही, अशा शेतकऱ्याच्या अनेक प्रश्नांना घेऊन जिल्हा काँग्रेसच्या वतीने जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या नेतृत्वात ४ मार्च रोजी चौक येथे सकाळी ११ वाजता पासून एक दिवसीय धरणे आंदोलन करून शासनाच्या धोरणाचा निषेध व्यक्त करणार आहे,

शेतकऱ्यांचे अत्यंत ज्वलंत प्रश्न आहेत. महाराष्ट्रातील महायुती शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफी सारखे अनेक आश्वासने दिलेली आहेत, मात्र त्यांच्या पुर्ततेसाठी राज्य शासनाकडून कोणतेही



प्रयत्न सुरू नाहीत. तसेच शेतकऱ्यांचे इतर अनेक प्रश्न असून त्याकडे राज्यशासन सतत दुर्लक्ष करीत आहे. या कारणास्तव शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे. राज्य शासनाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत आहे. या अधिवेशनामध्ये शासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करावी अशी काँग्रेस पक्षाची मागणी आहे. जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने इर्विन चौक येथे ४ मार्च रोजी सकाळी ११ वाजता पासून एक दिवसीय धरणे आंदोलन करून निषेध व्यक्त केल्या जाणार आहे ,या आंदोलनातब्लॉक अध्यक्ष, जिल्हा पदाधिकारी यांच्यासह शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केले आहे,

# भूमाफिया मालू, तलडा व वानखडेविरुध्द गुन्हा

## बनावटी मोजणी शिट करून जागा बळकाविण्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अमरावती** बनावट मोजणीशिट तयार करून व गुंडाच्या मदतीने लोखंडी कंपाऊड तोडून करोडो रुपयांची जागा बळकविणाऱ्या भूमाफियाविरुध्द गाडगेनगर पोलिसांनी सुदाम जानरावजी चव्हाण (वय ४६ रा. नवसारी) यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. वरुण प्रणय मालू, सुरज अशोक तलडा आणि नितीन विष्णू वाघमारे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. नवसारी मार्गावरील राजपुत ढाब्यामागे २०० मिटर आत राजेश वानखडे यांचे फॉर्म हाऊस आहे. तसेच बाजूला सुदाम चव्हाण, सुभाष नरसिंगदास राठी आणि निलेश प्रकाशराव ठाकरे यांच्या मालकीची जागा आहे. त्यांनी आपल्या जागेच्या भोवती लोखंडी कंपाऊड घेतलेले आहे. तसेच कंपाऊडलगत वरुण मालू, सुरज तलडा आणि नितीन वाघमारे यांनी ले-आऊट टाकले आहे.

२७ फेब्रुवारीला मालू व त्याच्या मित्रांनी गुंडलोकांच्या मदतीने लोखंडी कंपाऊड तोडून मोठ्या प्रमाणात जागा बळकावली. याबाबत माहिती पडताच चव्हाण, ठाकरे व राठी यांनी स्वतःच्या जागेवर जाऊन पाहणी केली. त्यानंतर मालू व त्याच्या मित्रांना विचारपुस केली असता त्यांनी भूमी अभिलेख कार्यालयामधील मोजणी शिट दाखविली. जागा आमच्या मालकीचे असल्याचा दावा केला. त्यामुळे ठाकरे, राठी व चव्हाण यांनी मोजणीशिटची पाहणी केली असता ती बनावटी असल्याचे स्पष्ट होताच त्यांनी गाडगेनगर पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून प्रकरण तपासात घेतले.अचलपूर पंचायत समितीने आयोजित केलेले हे दिव्यांग शिबिर गरजूंसाठी एक मोठी संधी ठरले. अशा उपक्रमांमुळे दिव्यांग व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ सहज मिळतो आणि त्यांचे जीवन सुकर होते. प्रशासनाने भविष्यातही असेच उपक्रम राबवावेत, अशी मागणी दिव्यांग बांधवांनी केली.

# जिल्ह्यात ११ वी प्रवेशाकरिता यावर्षीपासून अमरावती पॅटर्न

विदर्भ प्रजासत्ताकदि.३ अमरावती १ इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी आता ग्रामीण भागातही 'अमरावती पॅटर्न लागू केला जाणार आहे. राज्य सरकारने तसा निर्णय घेतला असून आगामी शैक्षणिक सत्रापासून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल. त्यामुळे एका गावात एकाहून अधिक महाविद्यालये असतील तरी प्रवेशासाठी प्रत्येक महाविद्यालयात स्वतंत्र अर्ज भरण्याऐवजी सर्व पर्यायांचा उल्लेख एकाच ऑनलाइन अर्जात करता येणार आहे.

अमरावती-बडनेरा-रहाटगाव (तिन्ही मिळून महापालिकेचे क्षेत्र तयार होते) या



तिन्ही गावांच्या हद्दीत असणाऱ्या महाविद्यालयांसाठी विद्यार्थ्यांना एकच अर्ज दाखल करावा लागतो. हीच पद्धत आता तालुके आणि मोठ्या गावांच्या ठिकाणीही लागू केली जाणार आहे. अमरावती महापालिका क्षेत्रात ६८ महाविद्यालये होती. कला, वाणिज्य, विज्ञान आण व्होकेशनल अशा सर्व शाखा मिळून यावर्षी ६ हजार १६० विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी ही पद्धत राबविण्यात आली.

### संभाव्य रचना अशी

ग्रामीण भागासाठी लागू केली जाणारी अकरावीची केंद्रीय प्रवेश पद्धत नेमकी कशी असेल, याबाबत अद्याप स्पष्टता झाली नाही. शिक्षणाधिकाऱ्यांशी संपर्क केला असता सध्या केवळ निर्णय कळवण्यात आला असून सरकारतर्फे इतर तपशिल यथावकाश कळवले जातील, असे सांगण्यात आले. तालुका स्तरावर एखाद्या महाविद्यालयाचे प्राचार्य अशी प्रवेश समिती असू शकते.

# फेरतपासणी चारचाकी वाहन, अडीच लाखांहून अधिक उत्पन्नाचा परिणाम

## १० हजार लाडक्या बहिणी अपात्र; फेब्रुवारीपासूनचा हप्ता बंद होणार

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३ अमरावती**विधानसभा निवडणुकी पूर्वी लाभार्थी म्हणून पात्र ठरवण्यात आलेल्या लाडक्या बहिणींच्या प्रस्तावांची फेरतपासणी पूर्ण झाली आहे. या तपासणीअंती जिल्ह्यातील



१० हजार ७६६ लाडक्या बहिणींना वेगवेगळ्या कारणांमुळे सदर लाभासाठी अपात्र ठरविण्यात आले आहे. त्यांच्याकडून यापूर्वीचे मानधन परत घेतले जाणार नाही, परंतु यापुढे फेब्रुवारी २०२५ पासूनचे त्यांचे मानधन मात्र थांबवण्यात येणार आहे.

जिल्ह्यात एकूण ७ लाखांवर महिलांनी या योजनेसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी ६ लाख ९८ हजार ५३६ महिला या योजनेसाठी पात्र ठरल्या. दरम्यान निवडणुका आटोपून नवे सरकार गठित झाल्यानंतर या सर्व प्रस्तावांची फेरतपासणी सुरु करण्यात आली असून निकषांची मोडतोड करत ऑनलाइन अर्ज दाखल करणाऱ्या महिलांचे तेव्हा पात्र ठरविण्यात आलेले अर्ज आता रद्द केले जात आहेत.निकषांची मोडतोड करुन ऑनलाइन अर्ज दाखल करणाऱ्या महिलांना संभाव्य कारवाईचीही भीती होती. त्यामुळे २० महिलांनी स्वतःहून या योजनेतून माघार घेतली आहे. त्यांच्यामुळे जिल्ह्यातील अपात्र महिलांची एकूण संख्या १० हजार ७८६ वर जाऊन पोचली आहे. दरम्यान ज्या महिलांना स्वत:हून लाभ नाकारायचा आहे

# अमरावती विद्यापीठात महिला प्राध्यापकासोबत अश्लिल चाळे

## डॉ. राजेंद्र प्रसादविरुध्द गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३ अमरावती**

विद्यापीठात एका महिला प्राध्यापिकेशी विभागप्रमुख काही वर्षापासून अश्लिल चाळे करीत असून तिच्या शरिराला वाईट हेतूने स्पर्श करतो. त्यामुळे प्राध्यापिका सतत तणावात राहत होती. अखेर या प्राध्यापिकेने त्रासाला कंटाळून फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.डॉ. राजेंद्र प्रसाद (वय ५२ रा. शंकरनगर) असे गुन्हा दाखल झालेल्या विभागप्रमुखाचे नाव आहे. तक्रारकर्ती महिला अमरावती विद्यापीठामध्ये सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. ज्या विभागात ती कार्यरत आहे, त्या विभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र प्रसाद हे नेहमीच त्यांना परीक्षेच्या गुणाबाबत विचारत होता आणि चर्चादरम्यान तिचा हात पकडत होता. तसेच हात ओढून मोबाईल हिसकावून घेणे, अश्लील शेरेबाजी करणे असे त्याचे प्रकार सुरूच होते. सन २०२२ मध्ये देखील महिला प्राध्यापक ही नोटीस बोर्डजवळ थांबली असता डॉ. राजेंद्र प्रसादने तिला पाहून अश्लिल शेरेबाजी केली होती तसेच ती केबिनमध्ये बसली असता डोकावून पाहत होता. गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या त्रासाला कंटाळून महिला प्राध्यापिकेने शनिवारी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी राजेंद्र प्रसादविरूध्द गुन्हा दाखल केला.-

# बालिकेवर अत्याचार करणाऱ्याला २० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३ अमरावती–** पाच वर्षांच्या बालिकेवर अत्याचारकेल्याप्रकरणी येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.व्ही. यार्तागड्डा यांच्या न्यायालयाने आरोपीला २० वर्ष सश्रम कारवासाची शिक्षा आणि १५ हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास २ महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. रोशन नागोराव मारोटकर (वय २६ रा. पळसखेड, ता. चांदूररेल्वे) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. दाखल दोषारोप पत्रानुसार पाच वर्षीय बालिका १३ फेब्रुवारी २०२१ रोजी घराबाहेर खेळत होती. रोशन मारोटकर याने हरभऱ्याचे आमिष दाखवून दोघांना घरात बोलाविले. त्यानंतर मुलीसोबत खेळणाऱ्या लहान मुलाला बाहेर पाठविले आणि मुलीवर जबरीने लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर मुलीने घडलेला सर्व प्रकार आईला सांगितला. आईने चांदूररेल्वे पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदवून रोशनला अटक केली. तसेच तपास अधिकारी यांनी तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.सरकारी व बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकून गुन्हा सिध्द होताच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.व्ही. यार्तागड्डा यांच्या न्यायालयाने आरोपी रोशन मारोटकरला २० वर्षाचा सश्रम कारावास आणि १५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास दोन महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.

# गुढीपाडवा व रमजान ईदची सुटी: महिन्यात ५ शनिवार - रविवार

## मार्चमध्ये १२ सुट्यांची पर्वणी

विदर्भ प्रजासत्ताकदि.३ अमरावती २नवीन वर्ष सुरू होऊन मार्च महिना उजाडला आहे. मार्च महिना म्हटला की वेध लागतात होळी पाठोपाठ मराठी नववर्ष असलेल्या गुढीपाडव्याचे. सण, उत्सवांसह तो नोकरदारांसाठी प्रत्येकी पाच शनिवार, रविवारसह होळी, गुढीपाडवा व रमजान ईदच्या सुट्यांची पर्वणी घेऊन आला आहे. ३१ दिवसांच्या महिन्यात नोकरदारांना १२ सुट्या उपभोगता येणार आहेत.




मार्चमध्ये जोडून सुट्या येत आहेत. त्यात १ व २ मार्चला पहिला शनिवार व रविवार आला आहे. ८ व ९ मार्चला दुसरा वीक एंड, १४मार्चला धुलिवंदन, त्यानंतर १५ व १६ मार्च, २२ व २३ मार्चला शनिवारी व रविवारी, २९ व ३० मार्च दुसरा विक एंड, २९ व ३० मार्च रोजी शनिवार-रविवार आहे. रविवारी गुढीपाडवा आहे, तर ३१ मार्च रोजी रमजान ईदची सुटी आहे. नोकरदारांचा या महिन्यात सुट्यांमुळे आनंदी आनंद आहे, तर होळी व रमजान ईदची सुटी मिळणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये देखील उत्साह दिसून येत आहे.

गुढीपाडवा आला रविवारी

मार्च महिन्यातील अनेक सुट्ट्यांपैकीच एक आहे मराठी नववर्ष असलेला गुढीपाडवा. गुढीपाडवा रविवारी येत असल्याने वेगळी सुट्टी राहणार नाही. त्यामुळे नोकरदारांसह विद्यार्थ्यांची देखील एक सुटी जाणार आहे.

### मार्च महिन्यातील सुट्या अशा

१, ८, १५, २२ व २९ शनिवार, २, ९, १६, २३ व ३० रविवारी १४ मार्च रोजी होळी, गुढीपाडवा (३० मार्च) वलगेच दुसऱ्यादिवशी ३१ मार्च रोजी रमजान ईद आहे.

विद्यार्थी नियोजनात व्यस्तयाची सगळ्या जास्त उत्सूकता आहे ती सण, उत्सवांसह तो नोकरदारांसाठी शालेय विद्याथ्यर्थ्यांना, त्यांना त्यांचे पुढील नियोजन करत परिवारांसोबत जाण्यासाठी धडपड चालू असते.

# जिल्ह्यात २ सरपंच, ४ उपसरपंच पदांची ७ मार्च ला निवडणूक

## निधन, राजीनामा, अपात्र व अन्य कारणांमुळे रिक्त झालीत पदे

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३ अमरावती–** जिल्ह्यात सहा ग्रामपंचायतींमध्ये न सरपंच, चार उपसरपंच दाकरिता ७ मार्च रोजी निवडणूक ण्यात येत आहे. या सहा पदांकरिता कावेळी सकाळी ११




वाजतापासून निवडणूक प्रक्रियेला सूरूवात केली बाणार आहे. त्यामुळे आता या ग्रामपंचायतींमध्ये सरपंच व उपसरपंच पदाकरिता लॉबिंग सुरू झाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.निधन, राजीनामा, अपात्र व अन्य कारणांमुळे रिक्त झालेले सरपंच, उपसरपदांकरिता निवडणुक विभागाने निवडणूक प्रक्रिया सुरू केली आहे. अशातच रिक्त झालेल्यासहा ग्रामपंचायतीमधील दोन सरपंच, चार उपसरपंच पदाकरिता निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला. यामध्ये भातकुली तालुक्यातील मार्की ग्रामपंचायतीचे सरपंच दाभाडे यांचे निधन झाल्याने सरपंच पदाकरिता निवडणुक होत आहे. याशिवाय अचलपूर तालक्यातील येवता सरपंच, रामापुर ब्रु. उपसरपं, धामणगाव रेल्वे तालूक्यातील गोकुळसरा उपसरपंच, अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सोनगाव उपसरपंच व दर्यापुर तालुक्यातील नालवाडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच या पदांकरिता येत्या ७ मार्च रोजी निवडणूक होणार आहे.

# २० वर्षांनंतर 'पंढरी'तून कृषिसिंचनाला पाणी : डाव्या कालव्याचा ३७०शेतकऱ्यांना लाभ : पाणी वाटपाला सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३वरूड**

तालुक्यात शक्ती नदीवर बांधण्यात आलेल्या पंढरी माध्यम प्रकल्पाच्या डाव्या कालव्यातून आ. चंदू यावलकर यांच्या हस्ते पाणी वाटपाला सुरुवात झाली. प्रारंभी दोन गावांमधील ४४४ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येणार आहेत. तब्बल २० वर्षानंतर पंढरी प्रकल्पातून पाणी सुटल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

दोन दशकांपूर्वी वाळवंट होण्याच्या मार्गावर असलेल्या तालुक्याला जीवदान मिळावे म्हणून तत्कालीन लोकप्रतिनिधींनी वर्धा डायव्हर्शन कॅनॉल, पंढरी मध्यम प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवली होती. पंढरी मध्यम प्रकल्प हा वरूड तालुक्यातील पुसला गावाजवळ शक्ती नदीवर बांधण्यात आला. तालुक्यातील एकमेव मध्यम प्रकल्प असून, यामुळे ३९ गावांतील ९१९१ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येणार आहे. प्रकल्पामध्ये ६२.२९ दलघमी पाणी वापर नियोजित असून ९.६९ दलघमी पाणी शक्ती नदीच्यापाणलोट क्षेत्रातून, तर ५२.६० दलघमी वर्धा नदीतून शक्ती नदीत वळविण्यात आले. राज्यातील ४९ व मध्य प्रदेशातील १८ चौरस किमी पाणलोट क्षेत्र आहे.(कलर बॉक्स)उजव्या कालव्यातून ३७ गावांना लाभ

पंढरी मध्यम प्रकल्पामध्ये वर्धा नदीवर पिंपलागड गावाजवळ संधानकातील वळण बंधारा बांधून त्यातून फिडर कालव्याद्वारे शक्ती नदीवर पंढरी मध्यम धरणात पाणी आणले. डाव्या व उजव्या कालव्याद्वारे सिंचन करण्याचे नियोजन आहे. उजवा कालव्यांतर्गत ३७ गावांचे ८७४७ हेक्टर आणि डावा कालव्यांतर्गत दोन गावांची ४४४ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येणार आहे.



### माजी आमदारांचे प्रयत्न सार्थकी

तत्कालीन आमदार नरेशचंद्र ठाकरे यांनी भूजल पातळी वाढावी, या उद्देशाने २००१ मध्ये वर्धा डायव्हर्शन सुपर एक्स्प्रेस कॅनॉलची प्रशासकीय मान्यता घेऊन काम सुरु केले. २००४ मध्ये तत्कालीन आमदार हर्षवर्धन देशमुख यांनी कॅनॉलचे पाणी संचयित करून सिंचनक्षेत्र वाढविण्याचे उद्देशाने पंढरी प्रकल्पाला मान्यता आणली. या दोहोंच्या योगदानामुळेच सिंचनाची उभारी मिळाली.

### आमदारांच्या हस्ते जलविमोचन

डाव्या मुख्य कालव्यावरील जलविमोचनाचा कार्यारंभ आ. चंदू यावलकर यांच्या हस्ते शुक्रवारी पार पडला. प्रमुख अतिथी म्हणून अमरावती मध्यम प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता सुरेंद्र आडे, डॉ. विजय देशमुख, नितीन ठाकरे, इंद्रभूषण सोंडे, राजेंद्र केदार, अभिजित अहेर, नितीन खेरडे, राजकुमार राऊत, अजिंक्य पारसे तसेच लाभक्षेत्रातील शेतकरी उपस्थित होते.

# ई-फेरफार; दुसऱ्या जिल्हात, राज्यात घरबसल्या करा ऑनलाइन फेरफार नोंदणी

### नागरिकांना मिळाला दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

ई-फेरफार प्रणालीमुळे दस्तनोंदणी आणि फेरफार नोंद घेण्याची प्रक्रिया एकत्रित झाली आहे. ज्यामुळे नागरिकांना तलाठी कार्यालयात वारंवार जाण्याची गरज पडत नाही. प्रक्रिया जलद गतीने होत असल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे. जानेवारीअखेर जिल्ह्यात ५६ हजारांवर फेरफार निर्गत झाले आहे. या प्रक्रियेत राज्यात जिल्हा दुसऱ्या स्थानावर आहे.शेतजमिनीच्या फेरफाराची प्रचलित हस्तलिखित पद्धत आता बंद झालेली आहे. महसूल विभागात ई-गर्व्हनन्सनुसार कामे होत असल्याने वित्त विभाग वगळतासर्व नोंदी ऑनलाइन घेतल्या जात आहेत. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या मदतीने ई-हक्क प्रणाली विकसित केली आहे. त्याआधारे गावपातळीवरून होणारी ई-फेरफारची प्रक्रिया ऑनलाइन केलेली आहे.तालुकास्तरावरील तहसीलदार कार्यालये, दुय्यम निबंधक कार्यालये, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालये आणि नगर भूमापन अधिकारी कार्यालये यांना सुरक्षित संगणकीय नेटवर्कद्वारे जोडण्यात आले आहे. त्यामुळे प्रक्रियेत पारदर्शकता आलेली आहे.नागरिकांना ई-फेरफारसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे. अमरावती जिल्ह्याच्या अधिकृत वेबसाइटवर 'ई-हक्क' या सेवेद्वारे मालमत्ता पत्रक नोंदणी व फेरफार अद्ययावत करण्यासाठी अर्ज करता येत असल्याने जिल्हावासीयांना दिलासा मिळाला आहे.




### जिल्हा स्थिती

| | |
|---|---|
| जानेवारीअखेर फेरफार नोंदी | ७५६३६ |
| नोंदविलेले फेरफार | ५६३४६ |
| प्रलंबित फेरफारची संख्या | २०३२ |
| प्रमाणित फेरफार नोंदी | ११००२६ |
| निर्गतीसाठी सरासरी दिवस | १६ |

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३भातकुली**

भातकुली तालुक्यातील खोलापूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या एका गावातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंगा केल्याची धक्कादाय घटना १ मार्च रोजी सकाळी ११. ३६वाजता च्या सुमारास उघडकीस आली. १७ वर्षीय अल्पवयीन मुलीच्या तक्रारीवरून खोलापूर पोलीस ठाण्यात आरोपी विरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला, सज्जन दिपक धंदर वय रा नावेड असे आरोपीचे नाव आहे.

आरोपीने फिर्यादीचा पाठलाग करून शिंगणापूर येथून फिर्यादीस म्हटले की माझे तुझ्यावर प्रेम आहे मला तुझ्याशी बोलायचे आहे माझ्यासोबत चल फिर्यादीने त्याला नकार दिल्याने आरोपी आणि फिरायला मारण्याची धमकी देत शिवीगाळ केली,

फिर्यादीच्या तक्रारीवरून खोलापूर पोलिसांनी आरोपी सजजन दिपक धंदर याच्या विरुद्ध भारतीय दंड न्याय संहिता कलम ७८ (१) ३५१ (२)३५२, भादवि सहा कलम पोस्को १२ नुसार गुन्हा दाखल करून पुढील तपास खोलापूर पोलीस करीत आहे.

# महिला महाविद्यालयात उद्या मोफत नेत्र तपासणी शिबिर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालय व महात्मे नेत्र रुग्णालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने महिला महाविद्यालय, जोग चौक, अमरावती येथे भव्य मोफत नेत्र तपासणी आणि मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर आज मंगळवर दि. ०४ मार्च, २०२५ रोजी सकाळी १० ते २ या कालावधीत आयोजित होणार आहे. हे शिबिर समाजातील सर्व गरजू विद्यार्थी, पालक तसेच नागरिकांकरिता आयोजित केले आहे.या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त लोकांनी घ्यावा असे आवाहन नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष मा.डॉ. माया शिराळकर,सचिव मा. प्रा. निनाद सोमन,कार्यकारणीतील सर्व सन्माननीय सभासद तसेच महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश मोहरिल यांनी केले आहे. या शिबिरात डोळे तपासणी झाल्यानंतर ज्या रुग्णांना मोतीबिंदूचे निदान होईल, अशा सर्व रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया महात्मे नेत्र रुग्णालय, अमरावती यांच्या मार्फत मोफत केल्या जाईल. तसेच शिबिराच्या दिवशी नेत्र रुग्णांना नंबरचे चष्मे २०० /- रुपये माफत दरात उपलब्ध करून दिल्या जाईल अधिक माहितीसाठी शिबिराच्या आयोजक प्रा. जयवंत पराते( मो. ७९७२००३४७९), डॉ. अर्चना पोले (मो. ९७३०७०८२८४) यांच्याशी संपर्क करावा.



# अंबानगरी फोटोग्राफर, व्हिडिओग्राफर पुरुष बचत गटाचा पदग्रहण सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

येथील अंबानगरी फोटोग्राफर, व्हिडिओग्राफर पुरुष बचत गटाचा पदग्रहण सोहळा जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील राज दरबार हॉटेलमध्ये नुकताच उत्साहात पार पडला.अंबानगरी फोटोग्राफर, व्हिडिओग्राफर पुरुष बचत गटाच्या माध्यमातून पदाधिकारी व सदस्यांना आर्थिक मदत मिळावी यासाठी या गटाची स्थापना करण्यात आली आहे.बचत गटाच्या प्रत्येक सदस्यांना आपल्या व्यवसायासाठी फायदा व्हावा, त्याचबरोबर भविष्यात एखादा मोठा उद्योग उभारून त्यामधून चांगल्या पद्धतीने नियोजन करता येईल, यासाठी हा बचत गट कार्यान्वित करण्यात आला. बचत गटाच्या आमसभेमध्ये आता सदस्यांना सुरुवातीलाच ५० हजार कर्ज मिळेल व त्याचबरोबर पुढील आमसभेपर्यंत एवढीच रक्कम देण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. बचत गटाचे अध्यक्षांना कर्ज पुरवठा समितीचे अध्यक्ष करण्यात आले. सदस्य म्हणून अनिल पडिया, राहुल पालेकर, विजय देवानी, हेमंत श्रीवास्तव या सर्वांची निवड आमसभेत एकमताने करण्यात आली. पदग्रहण सोहळ्याला पुरुष बचत गटाचे सदस्यमयुर डहाके, ऋषिकेश गुल्हाने, सचिन देशमुख, स्वप्निल मनवर, नितेश झा, भुषण रडके, आकाश लादे, प्रतिक रोहणकर, ऋषिकेश पावडे, राहुल शर्मा, रूपेश फसाटे, शशांक नागरे, महेश चौधरी, महेश सबनिस, सोहेल खान आदींची उपस्थिती होती.बॉक्सपाच वर्षांकरिता कार्यकारिणीची निवडअंबानगरी फोटोग्राफर, व्हिडिओग्राफर पुरुष बचत गटाच्या नवनिर्वाचित कार्यकारणीमध्ये अध्यक्ष निलश्याम चौधरी, उपाध्यक्ष राहुल पालेकर, सचिव मनीष जगताप, सहसचिव गजानन अंबाडकर, कोषाध्यक्ष प्रशांत टाके, कार्यकारिणी सदस्य अनिल पडीया, राजेश वाडेकर, संदीप पाटील, निखिल तिवारी, अक्षय इंगोले, अंकुश राऊत यांचा समावेश करण्यात आला आहे.



# आजारी श्वानांवर उपचार मित्रमंडळी करतात जवळचे पदरमोड

### अभिनव कॉलनीतील रहिवाशांचा स्तुत्य उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अचलपूर**


पशुपक्ष्यांनाही वेगवेगळे आजार होत असतात परंतु ते त्यांना बोलता येत नसल्याने आपल्याला ते माहीत नसतात त्यात तर भटक्या कुत्र्यांचा कोणी वालीच नाही अशा परिस्थितीत अचलपूर येथील अभिनव कॉलनीतील काही मित्रमंडळींनी एकत्र येऊन भटक्या कुत्र्यांना आजार झाल्यास वैद्यकीय उपचार देण्यासाठी पुढाकार घेतला आहे त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे .

प्राप्त माहितीनुसार अचलपूर येथील अभिनव कॉलनीतील एका डिंपी नावाच्या आवडत्या कुत्रीने दोन पिले दिली त्या पिलांवर या भागातील रहिवासी प्रेम करू लागले त्यामुळे त्यांचा सर्वांना लळा लागला एकाचे नाव कालू तर दुसऱ्याचे मालू असे नाव ठेवले त्यातील तीन महिन्याचा कालू नावाचे पिल्लू गंभिरआजारी झाले येथील रहिवासी असलेल्या ऋषीकेश डकरे, मयूर पोटे परिमल (चिंटू) पुरी कौस्तुभ गिरनाळे, देवश्री देशपांडे, सृष्टी देशपांडे ,अक्षय बावणे विशाल घाटे,श्वेता रोडगे, राणी व्यवहारे आदी उच्चविद्याविभूषित मित्रमंडळींनी आपापल्या जवळचे पैसे एकत्रित करून पशूंच्या डॉक्टरांना उपचारासाठी पाचारण केले कालूवर उपचार करण्यात आले यापूर्वीसुद्धा डिंपी नावाच्या कुत्रीवर काही कुत्र्यांनी हल्ला केल्यानंतर तिचे पोट फाटले होते त्यावेळी या सर्वांनी एकत्रित पैसे जमा करून डिंपीच्या पोटाचे ऑपरेशन करून केले होते आता डीपी एकदम तंदुरुस्त आहे

# शिवांजली साहित्य विचारपीठ पुणे तर्फे विशाल मोहोड यांच्या 'कीड' कादंबरीला आठवा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३पुणे**

शिवांजली साहित्यपीठ व महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा चाळकवाडी, पिंपळवाडी जुन्नर, यांचे तर्फे नुकताच पद्मविभूषण उद्योगपती रतन टाटा सभा मंडप पुणे- नाशिक महामार्ग चाळकवाडी ता. जुन्नर, जि. पुणे येथे आयोजित केलेल्या ३२ व्या राज्यस्तरीय शिवांजली मराठी साहित्य महोत्सवामध्ये श्री विशाल मोहोड यांच्या 'कीड' कादंबरीला अँड. महेश गोसावी पुरस्कृत शिवांजली साहित्य सन्मान प्रदान कारण्यात आला असून त्यामध्ये पुरस्काराचे स्वरूप आकर्षक सन्मानचिन्ह सन्मानपत्र व रोख रक्कम १७५० रुपये असे सन्मानाचे स्वरूप असून हा पुरस्कार शिवांजली साहित्य विचारपीठचे संयोजक श्री शिवाजी चाळक ,कार्यक्रम अध्यक्ष प्रा. डॉ. पुरुषोत्तम काळे, प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. महेश खरात, तर मा. प्रकाशजी होळकर यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला असून. कीड कादंबरीमध्ये सध्याचा ज्वलंत विषय त्यांनी घेतलेला असून आज बेरोजगार विध्यार्थ्यांची होणारी होरपळ, त्यांना करावे लागणारे कष्ट, आणि व्यवस्थेचा त्यांच्या मनावर होणारा परिणाम या सर्व गोष्टीचे चित्रण करणाऱ्या या कादंबरीला मिळालेला हा आठवा राज्यस्तरीय पुरस्कार असून सर्वीकडे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




# जळगाव आर्वीत आजपासून संत लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सवाला प्रारंभ : सात दिवस भागवत,कीर्तन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३धामणगाव रेल्वे**

विदर्भातील प्रत्येकाच्या हृदयात वसलेले संत परमहंस लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सवाला जळगाव आर्वी येथे उद्या मंगळवार पासून सुरुवात होणार असून सात दिवस भागवत, कीर्तनाचे आयोजन केले आहेदरवर्षी जळगाव आर्वी येथे संत लहरीबाबा पुण्यतिथी महोत्सव साजरा करण्यात येतो. उद्या मंगळवार ला सकाळी १० वाजता संत लहरी बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व कलश स्थापना होईल.



दररोज सात दिवस हभप वासुदेव महाराज सुपलकर यांचे संगीतमय भागवत राहणार आहे झाडगाव चिंचोली येथील येथील ह भ प केशव महाराज,ह भ प विलास कोरडे महाराज, ह भ प अनील महाराज साखरे,ह भ प स्वाधी सर्वेश्वरी दीदी , ह भ प विशाल महाराज बढे यांचे दररोज रात्री कीर्तन राहणार आहे सकाळी ग्रामसफाई गावकरी भजन मंडळाच्या वतीने काकडा हरिपाठ व सामुदायिक प्रार्थना राहणार आहे मंगळवारी ११ मार्च रोजी होम पूजा तर काल्याचे कीर्तन वासुदेव महाराज सुपलकर यांचे राहणार आहे यावेळी आमदार प्रताप अडसड, गोपाल भूत अर्चना वानखडे यांची उपस्थिती राहणार आहे याच दिवशी सायंकाळी दिंडी महोत्सव आयोजीत केला असून यात विदर्भातील नामवंत दिंड्या सहभागी होणार आहे या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन संत लहरी बाबा संस्थान व ग्रामस्थांनी केले आहे.

# अमरावतीत शिवप्रेमी व सर्वपक्षीय शिवसन्मान मोर्चा;प्रशांत कोरटकर यांच्या विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि३ अमरावती**

प्रशांत कोरटकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविरुद्ध केलेल्या बेताल वक्तव्याच्या विरोधात आज, ३ मार्च रोजी, अमरावतीत शिवप्रेमी व सर्वपक्षीय शिवसन्मान मोर्चाचे आयोजन करण्यात आले. हा मोर्चाला पंचवटी चौक येथून सुरुवात होऊन इर्विन चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार अर्पण केल्यानंतर गर्ल्स हायस्कूल चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा धडकला. मोर्चाच्या माध्यमातून कोरटकर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

या महामोर्चामध्ये काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे, शिवसेना (उबाठा) आमदार गजानन लवटे, माजी आमदार यशोमती ठाकूर, माजी आमदार सुनील देशमुख यांच्यासह सर्व पक्षीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी मोठ्या संख्येने शिवप्रेमींनी छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणा देत आक्रोश व्यक्त केला. या आंदोलनाद्वारे सरकारकडे कोरटकर यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली असून, भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना सहन केले जाणार नाही, असा इशारा आंदोलकांनी दिला.

यशोमती ताई ठाकूर, बळवंत भाऊ वानखडे, सुनील भाऊ देशमुख, विलास भाऊ इंगोले, बबलू शेखावत, मिलिंद चिमोटे, किशोर बोरकर, प्रदीप हीवसे, हरीश मोरे, किशोर सांगोले, अरविंद गावंडे प्रदेश उपाध्यक्ष मराठा सेवा संघ, राजेंद्र ठाकरे जिल्हाध्यक्ष मराठा महासंघ, अजय लेंडे शिव सन्मान महामोर्चा सन्मवयक, प्रवीण मनोहर, एड. दिलीप एडतकर, मेहराज खान पठाण, मनोज अंबाडकर, प्रदीप राऊत, सुधाकर तलवारे, डॉक्टर बेलसरे, प्रमोद इंगोले, वैभव देशमुख, सौरभ तायडे, यश आहेर, रोशन साबळे, प्रा.नरेंद्र राऊत, प्रा.अंबादास मोहिते, चंद्रकांत मोहिते, रुपेश सवाई, विशाल पवार, महेश तराळ, पुरुषोत्तम बोदडे शहराध्यक्ष मराठा महासंघ, अण्णासाहेब धोटे, विलासराव ठाकरे, विजय ठाकरे, प्रीतीताई बंड, मैथिली पाटील, कल्पना बुरंगे, एड. नीता कचवे, छाया पाथरे, प्रेम बोके, मयुराताई देशमुख आंतरराष्ट्रीय अध्यक्षसीमा बोके, हर्षा ढोक जिल्हाध्यक्ष जिजाऊ ब्रिगेड, प्रतिभा रोडे शहराध्यक्ष जिजाऊ ब्रिगेड, शीला पाटील, अंजली ठाकरे, जयश्री वानखडे महिला शहराध्यक्ष काँग्रेस अभिनंदन पेंढारी, हरिभाऊ मोहोळ, अनिल देशमुख, प्रा. गजानन कोरे सर, अनिकेत देशमुख, अंकुश डहाणे, आकाश वडतकर, अकबर भाई, रवी मोहोळ, सुभाष धोटे, राजेंद्र पाटील, रणजीत तिडके, प्रवीण पाटील, वसु महाराज प्रहार, बंटी रामटेके जिल्हाध्यक्ष प्रहारउपस्थित होते. सदर च्या मोर्चामध्ये अखिल भारतीय मराठा महासंघ,मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड,जिजाऊ ब्रिगेड काँग्रेस ,राष्ट्रवादी काँग्रेस,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे ,प्रहार संघटना,शिवसेना शिंदे गट. व अन्य संघटना सामील सामील झाल्या होत्या.

## डफरीन परिसरात होणार १०० खाटांचे माता व बाल संगोपन केंद्राची नूतन इमारत

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ३ अमरावती**


अमरावती मध्ये आरोग्य सेवांचा विस्तार व बळकटीसाठी आ. सौ. सुलभाताई खोडके यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू असल्याने रुग्णांना नवी आरोग्य संजीवनी मिळाली आहे. अशातच आता गर्भवती महिलांना सुरक्षित प्रसूतीसाठी मदत व्हावी , आई आणि बाळाला आधार मिळावा यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन )परिसरात १०० खाटांचे माता बाल संगोपन केंद्राची नवीन इमारत बांधण्यात येणार आहे. या करिता आ. सौ. सुलभाताई खोडके यांच्या प्रयत्नातून शासनाकडून ३३.४० कोटींचा निधी मंजूर झाला असून येत्या मे २०२५ पासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.



अमरावती जिल्ह्यात महिला व बालकांच्या आरोग्याला घेऊन अनेक उपाययोजना करण्यात येत असतांना धारणी-मेलघाट दुर्गम भाग, ग्रामीण क्षेत्र तसेच शहरी भागातील झोपटपट्टी क्षेत्र अशा ठिकाणी आजही कूपोषण,माता मृत्यू , बालमृत्यू सारखी समस्या निर्माण झाली आहे. यामुळे महिलांचे प्रसूतीपूर्व तपासणी,लसीकरण, पोषण आहार, औषधी, कुटुंब कल्याण , बाळांचे आरोग्य अशा विविध बाबतीत चांगल्या सुविधा निर्माण करण्याला घेऊन आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी आरोग्य प्रशासनासोबत संवाद व समन्वय साधला. त्याअनुषंगाने आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी स्थानिक आरोग्य प्रशासनासोबत वारंवार बैठका घेऊन महिला व बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने दीर्घकालीन उपायोजना करण्याच्या सूचना केल्या. तसेच या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर निधी उपलब्धतेला घेउन राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याकडे पाठपुरावा केला. याची फलश्रुती म्हणून आता जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन )परिसरात १०० खाटांचे माता बाल संगोपन केंद्राची नवीन इमारत बांधकामाकरिता शासनाकडून ३३.४० कोटींचा निधी मंजूर झाला आहे.

## जिल्ह्यातील वन्यजीव कॉरिडॉरसाठी निधीची वानवा
### आज जागतिक वन्यजीव दिवस: जनजागृतीची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**



अमरावती जिल्ह्याला निसर्गाने मुक्तहस्ताने साधन संपत्तीची उधळण केली आहे. जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी जंगलांचे प्रमाणही भरपूर आहे. त्या दृष्टीने वन्यप्राण्यांची व जंगलांची संख्याही उत्तम आहे; परंतु मानव व वन्यजीव यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी आवश्यक असलेल्या वन्यजीव कॉरिडॉर निर्मितीला 'खो' दिला जात आहे. निधीची वानवा हेच यामागील प्रमुख अडचण आहे. ३ मार्च हा दिवस सर्वत्र जागतिक वन्यजीव दिवस साजरा केला जात असतो.जागतिक वन्यजीव दिन हा केवळ एक दिवसाचा उत्सव नाही. ग्रीन हेरिटेज पर्यावरण संस्थेने पर्यावरण बचावासाठी अनेकदा शासनाला निवेदने दिली. निधीची तरतूद होणे अपेक्षित होते. राजकीय इच्छाशक्तींचा अभाव व निधीअभावी हरित व व्याघ्र कॉरिडॉरचा प्रस्ताव धूळखात आहे.याबाबत जाणीव जागृती करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ (युनोने) वन्यजीव दिवस साजरा करण्याचे ठरविले. धोका असलेल्या वन्य सृष्टीला, आंतरराष्ट्रीय व्यापारावर बंधन आणणारा कायदा ३ मार्च १९७३ रोजी १८० देशांनी मान्य केला. म्हणून ३ मार्च या दिवसाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

वाढते शहरीकरण ही बाब जंगलतोड, शेतीसाठी जमिनीचे रूपांतरण, अधिवास नष्ट होण्यास महत्त्वाचे योगदान देतात. निसर्गाकडे लक्ष देत जल, जंगल, जमीन, जनावरे, पक्षी व अन्य जीवांचे संरक्षण करण्यासाठी जमिनीवर सक्रियपणे काम करणाऱ्या संस्थांना आर्थिक हातभार लावणे आज अत्यंत आवश्यक आहे.

## हिशेब जुळेना, शालेय पोषण आहार मिळेना
### विद्यार्थ्यांना आहारापासून पोषण वंचित राहण्याची वेळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**




प्रधानमंत्री पोषण शक्ती योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना पोषण आहार दिल्या जातो. मात्र जिल्ह्यातील बहुतांश शाळांतील तांदळाच्या साठ्याची आकडेवारीच जुळत नसल्याने मागणी करूनही तांदूळ मिळत नसल्याची स्थिती आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांना आहारापासून पोषण वंचित राहण्याची वेळ आली आहे. तांदळाचा हिशेब जुळविण्यासाठी शिक्षण विभागाने आपल्या स्तरावर दोन वेळा पत्र काढले, मात्र अद्यापही तांदळाचा हिशेब लागला नसल्याने शिल्लक तांदूळ गेला कुठे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यामध्ये मात्र विद्यार्थ्यांना घरूनच जेवण करून यावे लागत आहे.विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ रहावे, त्यांना पोषण आहार मिळावा यासाठी सरकारकडून शाळांमध्ये पोषण आहार पुरविला जातो. यामध्ये वेगवेगळ्या मेनूचाही समावेश आहे. ठरवून दिलेल्या प्रमाणानुसार विद्यार्थ्यांना शाळेत पोषण आहार दिल्या जातो. मात्र जिल्ह्यातील अनेक शाळांतील तांदूळ संपला असल्याने मागील काही दिवसांपासून काही शाळांत पोषण आहार देणे बंद आहे. विशेष म्हणजे, रेकार्डनुसार जिल्ह्यात तांदळाचा साठा पुरेसा आहे.

**दोष कोणाचा?**

एकही विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित राहू नये, असा न्यायालयाचा आदेश आहे. असे असतानाही जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांना मागील दोन महिन्यांपासून पोषण आहारच मिळत नसल्याने, कारवाई कोणावर होते, याकडे आता पालकांचे लक्ष लागले आहे.

## निवडणूक इच्छुकांची तयारी थांबली! स्थानिक स्वराज्य संस्थानिवडणूक लांबणीवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्याने भावी नगरसेवकांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण पसरले आहे. महानगरपालिका, नगरपालिका,नगरपरिषद यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणुका आता आणखी पुढे गेल्याने निवडणुकीची प्रतीक्षा करणाऱ्या उमेदवारांची वाढली आहे. एप्रिल ते मे महिन्यात निवडणुका होण्याची शक्यता होती. मात्र, त्या लांबणीवर पडल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये निराशा पसरली आहे. निवडणुकीच्या तयारीसाठी केलेला खर्च आणि प्रचार यावर इच्छुकांनी तात्पुरता ब्रेक लावल्याचे दिसत आहे. विविध भागांमध्ये जनसंपर्क वाढवणे, कार्यकर्त्यांचे स्नेहभोजन, उत्सवांमध्ये सहभाग आणि प्रचारासाठी होणाऱ्या खर्चावर आता काही काळ खीळ बसली आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांना आपल्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याची वेळ आली आहे. काही ठिकाणी मात्र अजूनही वातावरण तापलेले आहे.

**निवडणुकीची अनिश्चितता, भेटीगाठी थांबल्या!**

कार्यकर्त्यांशी संपर्क साधणे, सभा घेणे आणि विविध ठिकाणी भेटीगाठी करून आपला जनाधार मजबूत करण्यासाठी उमेदवारांनी मोठ्या प्रमाणात तयारी केली होती. मात्र, निवडणुकीच्या अनिश्चिततेमुळे हे सर्व थांबले आहे. निवडणुका कधी होणार याचा अद्याप तरी काही मुहूर्त दिसत नसल्याने उगाच खर्च करणे महागात पडत असल्याने इच्छुकही आता शांत बसत आहेत.

**इच्छुकांच्या राजकीय हालचाली मंदावल्या!**

निवडणुका केव्हा होतील आणि प्रचार पुन्हा कधी सुरू करायचा याबाबत सर्वच जण संभ्रमात आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवर राजकीय हालचाली मंदावल्या असून, इच्छुक उमेदवारांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे.निवडणूक कार्यक्रमाकडे इच्छुकांचे लक्ष लागले असून, ते जाहीर झाल्यावरच वातावरण तापणार आहे.

## जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा मुख्याध्यापका विना
### मुख्याध्यापक पदोन्नतीच्या प्रतीक्षेत ज्येष्ठ शिक्षक निवृत्तीच्या पोहोचले जवळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

दर्जेदार शिक्षणामुळे जिल्हातील अनेक जिल्हा परिषद शाळांनी आपली वेगळी छाप उमटवली आहे; परंतु जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळेतील उच्च श्रेणी मुख्याध्यापकांची पदे रिक्त असल्याची खंत पालकवर्गातून होत आहे. जिल्हा परिषदेने उच्च श्रेणी मुख्याध्यापक पदोन्नती संदर्भात यादी प्रसिद्ध केली.परंतु मुख्याध्यापक पदोन्नती न केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. जिल्हा परिषदेच्या अनेकशाळांमध्ये उच्च श्रेणी मुख्याध्यापक नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे शालेयस्तरावर निर्णय घेण्यास अनंत अडचणी येत असून महत्त्वाचे निर्णय घेण्यासही विलंब होत आहे.शाळेतील शिक्षकांना अध्यापन करूनउच्च श्रेणी मुख्याध्यापक पदाचा प्रभार सांभाळावा लागत आहे.त्यामुळे प्रभार सांभाळणाऱ्या शिक्षकांवर ताण येत आहे.उच्च श्रेणी मुख्याध्यापक हे महत्त्वाचे पदे लवकरात लवकर भरावीत,अशी मागणी पालक वर्गातून होत आहे. अनेक शाळांवर आता प्रभारी मुख्याध्यापक असून त्यांच्यावरच मुख्याध्यापकांची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे शाळेच्या व्यवस्थापनावर या प्रभारीपदाचा परिणाम होत आहे. तसेच, जे वरिष्ठ शिक्षकांनी आता मुख्याध्यापक होण्याची पात्रता पूर्ण केली आहे, त्यांनाही या पदाची आस लागली आहे.



शाळेच्या व्यवस्थापनासाठी, प्रशासनासाठी उच्च श्रेणी मुख्याध्यापक पद महत्त्वाचे पद आहे.दर्जेदार शिक्षणासाठी शाळेत ठोस उपाययोजनांची गरज आहे.त्यामुळे उच्च श्रेणी मुख्याध्यापक हे महत्त्वाचे पद भरणे आवश्यक आहे.

**राजेश सावरकर,राज्य प्रसिध्दी प्रमुख महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती**

## विद्याभारती जेम्सद्वारा जल्लोषात जोश २०२५ संपन्न : वीर शहिदांच्या पत्नींचा सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**




स्थानिक, विद्याभारती महाविद्यालय, कॅम्प, अमरावती येथे जेम्स अंतर्गत वार्षिक स्नेहसंमेलन जोश २०२५ दि. ०२ मार्च २०२५ रोजी उत्साहात संपन्न झाले. हे स्नेहसंमेलन विद्याभारती शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. रावसाहेब शेखावत व विद्याभारती जेम्सच्या अध्यक्षा सौ. मंजरीताई शेखावत यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनात घेण्यात आले. देश की शान हमारे जवान ही संकल्पना घेऊन जेम्सद्वारा आयोजित जोश २०२५ चे आयोजन करण्यात आले. याच कार्यक्रमात श्रीमती कांताबाई शंकर सांगोले, श्रीमती नूतन नंदकिशोर खांडेकर, श्रीमती वनमाला गेठे, श्रीमती सरस्वती ओंकार मासोदकर या वीरपत्नींचा तसेच श्रीमती बेबीताई 'जानराव उईके या वीरमातेचा तसेच परिसरातील बालवीर शौर्य पदक मिळविणाऱ्या करीना थापा हिचा सन्मान करण्यात आला. महाविद्यालयाच्या वतीने त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब शेखावत म्हणाले हे स्नेहसंमेलन केवळ नृत्य नाट्य याचा अविष्कार करणारे नसून विचारांचे व प्रत्येकाला अंतर्मुख करणारे, राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव निर्माण करून देणारे, वैज्ञानिक दृष्टिकोन देणारे व निसर्गाबाबतची भावगर्भता व्यक्त करणारे आहे असे प्रतिपादन केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळवून देण्यासाठी तसेच अंगभूत गुणांच्या कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यासोबतच त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, विद्यार्थ्यांमध्ये स्वतःबद्दल व आपल्या कलागुणांबद्दल आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी जोश २०२५ द्वारा विविध कलाप्रकार रंगमंचावर सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या बुद्धिमतेला चालना मिळावी यासाठी प्रश्नमंजुषा आणि वक्तृत्व स्पर्धा असे कार्यक्रमही यामध्ये घेण्यात आले. अशा भरगच्च कार्यक्रमाची रेलचेल विद्याभारती जेम्सच्या यारंगमंचावर महाविद्यालय परिसरातील विद्यार्थ्यांनी अनुभवली. अमरावती परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सातत्यपूर्ण जागृत असणारे हे महाविद्यालय आहे. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची व सामाजिक दायित्वाची भावना जागृत व्हावी यासाठीच यावर्षीच्या जोश २०२५ मध्ये महाविद्यालयातील कलावंत विद्यार्थ्यांनी गीतगायन, नृत्य, नाटिका, एकपात्री प्रयोग, राष्ट्रभक्तीपर कार्यक्रम, स्वरधारा, फॅशनशो अशा उत्तमोत्तम कार्यक्रमातून आपला कलाविष्कार सादर केला आहे. या कार्यक्रमाला अमरावती जिल्ह्याचे पोलीस उपायुक्त श्री. शिवाजी शिंदे व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील अधिष्ठाता डॉ. वैशाली चौखंडे तसेच या कार्यक्रमाला शहरातील अनेक गणमान्य व्यक्तींनी भेट दिली व विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कार्यक्रमाचा आनंद घेतला. या स्नेहसंमेलनाला बँक ऑफ महाराष्ट्र, बैंक ऑफ बडोदा, इंडियन बँक व सिमरन बुटीकचे प्रायोजकत्व लाभले. या स्नेहसंमेलनात अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व आपला कलाविष्कार दाखवून पारितोषिक प्राप्त केले.सदर कार्यक्रमाला संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. मिथिलेश राठौर, सचिव मा. डॉ. अशोक चव्हाण, संस्थेचे कोषाध्यक्ष मा. रघुनाथजी रोडे, महाविद्यालयाच्या प्राचार्यडॉ. प्रज्ञा येनकर, फार्मसीचे प्राचार्य डॉ. एस. डी. पांडे, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. व्ही. शिरभाते, आयटीआयचे प्राचार्य जी.बी. तंवर, तसेच प्राचार्य डॉ. आर्. एम. पाटील, मा. संजय राजपूत, डॉ. ए. डी. चव्हाण, मा. मनिंदर मोंगा, जेम्सचे समन्वयक मा. उपप्राचार्य एच. के. सिसोदिया, प्रा. अथर इकबाल व कोअर कमिटी मधील विद्यार्थी अक्षत तिवारी, समृद्धी डहाके, जानवी बोबडे, सेजल कानफाडे, पलक चव्हाण, दिप जायस्वाल, गुंजन पिंपळते, वंश वाटणकर, धनश्री भांबुरकर, जेसिका चौरपगार, जेम्स स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. महाविद्यालयाच्या विविध विभाग प्रमुख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान देऊन हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.